म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २६२०





REFBK-0026305
REFBK-0026305

# मंत्राक्षर

अरुणा ढेरे

## आमचे संग्राह्य कवितासंग्रह

चिन्मयी
**बा. भ. बोरकर**

बोरकरांची प्रेमकविता
**संपादक : रा. चिं. ढेरे**

तोच चंद्रमा
**शान्ता ज. शेळके**

कळ्यांचे दिवस फुलांच्या राती
**शान्ता ज. शेळके**

झोपेचा गाव ( बालगीते )
**शान्ता ज. शेळके**

मंझधार
**अनुराधा पोतदार**

यक्षरात्र
**अरुणा ढेरे**

फकिराचे अभंग
**फ. मुं. शिंदे**

आई आणि इतर कविता
**फ. मुं. शिंदे**

जन्मजान्हवी
**शान्ता ज. शेळके**

सुरेश एजन्सी पुणे

२६२०

२६३०५

८।२।९१

२६२०
२६३०
८।२।९१

# मंत्राक्षर

REFBK-0026305

अरुणा ढेरे

सुरेश एजन्सी
पुणे

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे ४११ ००२

© डॉ. अरुणा ढेरे
'विदिशा', प्लॉट क्र. ३२
तुळशीबागवाले कॉलनी
पुणे ४११ ००९

मुखपृष्ठ
चंद्रमोहन कुलकर्णी

पहिली आवृत्ती
उत्तरायणारंभ /
२२ डिसेंबर १९९०

किंमत पन्नास रुपये

मुद्रक
उल्हास लाटकर
अक्षर चिंतामणी
सदाशिव पेठ,
टिळक रोड, पुणे ४११०३०

माझ्या भावडांना—

घराच्या सावलीत
आपण किती निश्चिंत वाढतो आहो !

## ऋण : शब्दांचे आणि माणसांचे

आपण कुणी ज्ञानी सिद्ध नसतो, की ऋषी-महर्षीही नसतो. तरी आपल्यापुरते कवितेचे मंत्राक्षर हे भाषेमध्ये जगण्याचे अवतरण घडवणारेच असते, असे मला वाटते. तीच आवाहकता, तीच भारण्याची शक्ती आणि सृष्टीतल्या चैतन्याचा गाभा सांभाळणारा तोच अपार अवकाश !

म्हणून या संग्रहाचे नाव ' मंत्राक्षर '.

यांपैकी बहुतेक कविता अलीकडच्या, म्हणजे गेल्या तीन वर्षांमधल्या आहेत. त्यांच्यातील काही कवितांवर माझ्या मनात सतत घोळणाऱ्या एका विचाराची सावली आहे. अतिशय दीर्घ अशा या सावलीतल्या कवितांचा एक गटच तयार झाला आहे म्हणा ना !

पुष्कळ वेळा कलावंत आणि त्याचे माध्यम याचा विचार साहित्याच्या अंगाने माझ्या मनात येतो आणि आपली सबंध वाङ्मयीन परंपराच डोळ्यांसमोर उभी रहाते. किती तऱ्हांनी आजवर कलावंतांना शब्द भेटला आहे ! किती परींनी त्यांनी शब्दाला भोगले आहे आणि खेळवले आहे त्यांना शब्दानेही !... कलावंताला भेटलेला शब्द हाच माझ्यासाठी कुतूहलाचा विषय बनून गेला. कलावंत आणि शब्द या दोघांमधले शतरूपी नाते मला आयुष्यातल्या अनेक घटना-प्रसंगांमध्ये विरघळताना दिसले. त्यातून, संस्कृतीच्या प्रवासात या नात्याचा शोध घेणाऱ्या पुष्कळ कविता आल्या. माझ्या इतर कवितांबरोबरच अशा कवितांचा एक स्वतंत्र गट या संग्रहात आहे.

माझ्या कवितांचे जागरूक कौतुक करणाऱ्या शांताबाई शेळके यांची दक्ष नजर या संग्रहावरून फिरली आहे. त्यांच्या जिव्हाळ्याने मला पुष्कळ काही दिले आहे. माझी लहान-मोठी मित्रमंडळी, साक्षेपाने आवडनिवड कळवणारे ज्येष्ठ आणि उमेद वाढवणारे सारे आदरणीय, ही तर माझीच माणसे !

यांच्याबरोबरच श्री. रवींद्र खोपकर, श्री. अण्णासाहेब लाटकर, चित्रकार श्री. चंद्रमोहन कुलकर्णी यांचीही आठवण आहे.

हा माझा तिसरा कवितासंग्रह. 'प्रारंभ' आणि 'यक्षरात्र' यांच्यापाठोपाठ तीन वर्षांनी तो प्रसिद्ध होतो आहे, याचे सगळे श्रेय प्रकाशकांचे. श्री. बाळासाहेब कारले यांचा आग्रह आणि माझ्या इतर सर्व पुस्तकांच्या प्रकाशनांबाबतचे त्यांचे प्रोत्साहक सातत्य नसते, तर कदाचित् इतक्या प्रसन्नपणे आणि इतक्या नेटाने हे सारे माझ्याकडून झाले नसते. त्यांचे ऋण फार मोठे आहे. या संग्रहाची जुळणी करता करता माझ्याइतकाच तो या सर्वांचा झाला. आता तो तुमचाही आहे.

पुणे, १ डिसेंबर १९९०

— अरुणा ढेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६२०
काव्य क्र. ६३७५
८/२५९
(मराठी ग्रंथ संग्रहालय शाखा)

# अनुक्रम


१. मंत्राक्षरे / १
२. नीळकंठ / २
३. बाभळीला फुले आली / ४
४. परागंदा / ५
५. सरली वो रात / ७
६. देवतळे / ८
७. गाण्याच्या जन्मासाठी / १०
८. नको भेटूस अवेळी / ११
९. अंतर / १२
१०. शब्द मला दे साधा / १३
११. शरद / १४
१२. ढग दाटून येईल / १५
१३. दुःखाचा उखाणा / १६
१४. निराधार / १७
१५. शेंगा खुडताना / १८
१६. माझ्या मित्रा / १९
१७. तुझे वेगळे भविष्य / २१
१८. या इतुक्या जवळपणी / २३
१९. नात्यांमधून रुजताना / २४
२०. राघू अंगणात आले / २५
२१. ओळखीच्या पार पलीकडे / २६
२२. चव मनाची घेताना / २८
२३. चंद्र निजेवर आला / २९
२४. जमीन उत्सव करतेय् / ३०
२५. आले भरून स्वतःत / ३२
२६. अनुच्चारित / ३३
२७. असा तसा येतो वारा / ३४
२८. पुष्कळ सोपे होते जगणे / ३५
२९. एक लसणारी वाट / ३६
३०. नवे निराळे होण्यासाठी / ३७
३१. नव्या मनाची घडी मोडली / ३८
३२. ऋतू मनाहून निळा / ३९
३३. एक एवढेसे सत्य / ४०
३४. ओटीत चंद्र माझ्या / ४२
३५. मी काय करू / ४३
३६. सईबाई ग / ४५
३७. धुक्यात विरते गती / ४६
३८. भर पावसात / ४७
३९. जरी तुला कधी न बोलले / ४९
४०. ओले उदास गगन : १ / ५०
४१. ओले उदास गगन : २ / ५१
४२. सुभद्रा / ५२

४३. शैशवतारा / ५४
४४. अवघड / ५५
४५. या गंगेच्या पार / ५७
४६. हा क्षण / ५८
४७. फिका पाऊस / ५९
४८. विश्वासाचा शब्द / ६०
४९. त्वचेचिया राना / ६१
५०. तुझे जवळपण / ६३
५१. माती निकामी होते / ६४
५२. ठिपका / ६६
५३. पैल श्वासांच्याच फक्त / ६७
५४. जाणीव / ६८
५५. नख एकटेपणाचे / ६९
५६. घरगुती वासाचे गाणे / ७०
५७. प्राणांच्या ऐलपैल / ७२
५८. पुरता तू छद्मी / ७३
५९. उच्छाद / ७४
६०. निष्पर्ण / ७५
६१. शब्दाचा आडोसा / ७६
६२. लाही / ७७
६३. मुकी आठवण / ७८
६४. आसक्तीचे आभाळ / ७९
६५. अनवाणी दुःख / ८०
६६. दिवे लावताना आत / ८१
६७. पैंजण / ८२
६८. मीही जगू पाहते / ८३
६९. काळ्या नदीच्या काठाशी / ८४
७०. मेंढपाळाचे गाणे / ८५
७१. एका चंद्रभासासाठी / ८७
७२. मोठे होत जातात शब्द / ८८
७३. तरिहि / ८९
७४. ऊन संथ चढत जाते / ९०
७५. वाऱ्याच्या झोंबीने / ९१
७६. कोरा कागद / ९२
७७. चित्र / ९४
७८. मरणाऱ्या संबंधाची गोष्ट / ९६
७९. मनाच्या तावदानावरून / ९७
८०. खूळ / ९८
८१. केशराची खूण / ९९
८२. भवतीच्या कोलाहलातून / १००
८३. बीज / १०३
८४. झाड / १०४
८५. आदिमाया / १०६
८६. बाग / १०८
८७. करुणेचा चंद्र / १०९
८८. गारुडी / १११
८९. ताजा उष्ण आवाज / ११३
९०. शिकार / ११५
९१. यातुधान / ११७
९२ निर्मनुष्य नवीन वाटेवर / ११९
९३. नामानिराळा / १२१
९४. देवळाच्या गाभाऱ्यात / १२३
९५. निर्णयाचा क्षण / १२५
९६. अज्ञात / १२७
९७. पुऱ्या झाल्या ओवीमध्ये / १२९
९८. अपरात्री / १३१
९९. भुकेला शब्द / १३३
१००. करुणाष्टक / १३४

## मंत्राक्षरे

कार्तिकातल्या एखाद्या शांत दुपारी
पायवाटेवर निथळत असावेत
हिरव्या उन्हाचे कवडसे,
तसे स्तब्ध दु:खावर निथळणारे
तुझे श्वास मला आठवतात.

तरुण मुलींच्या ओठांवर
अकारण उमलणाऱ्या गुणगुणण्यासारखे
जगण्याचे उमाळे नसांमधून दाटून येतात.

हे सगळे कसे घडते कळत नाही
पण भरून जाते मन
एखाद्याच्या नुसत्या सद्भावनेनेही.

गाण्याच्या उगमापाशी
सर्वस्व नवे करणारा नि:संदर्भ आदिकाळोख
जसा भेटतो हृदयस्पर्शी रीतीने,
तसे आयुष्य भेटते मला;
आणि मागच्या-पुढच्या साऱ्या कवितांची
मंत्राक्षरे होतात,
जगण्याचे उमाळे नसांमधून दाटून येतात.

१६.११.१९९०

## नीलकंठ

ज्याच्या अस्तित्वाचे पुरावे देता येणार नाहीत
उद्या किंवा कदाचित् पुढच्या क्षणीही,
अशा दाखवीन मी तुला पुष्कळ गोष्टी.

उदाहरणार्थ,
हा निळा एकटेपणा आभाळभर
ही पिवळी लकेर वाऱ्यावर
हे हिरवे रान अंधारभर
ही लाल ठिणगी अंगभर.

तसे शाश्वताचे नखही कधी लागते अशाश्वताला
आणि होते· जखम तीव्र धारेची,
मग गोष्टी ठामच वाटतात कधी कधी.

उदाहरणार्थ,
तो पहाडी विस्तार अपरंपार
ती महानदीची ओली धार
ते स्तब्ध चांदणे पाण्यावर
तो शोकाचा हृदयाकार.

आपण नये नाकारू अशाश्वत
आणि नये नाकारू शाश्वताची जखम
कारण ओठ असतात आपल्याला
अन् जखमेत असते रक्त,
पिऊन कधी, कसे घ्यायचे जहर
याचा निर्णय करायचा फक्त.

मग उरेल तो नीलकंठ असा संपूर्ण क्षण आपल्यासाठी
आणि त्यात आपले एकमेकांचे असणे
अपार हवेसे, तरीही केवढे जीवघेणे !

९.२.१९८९

## बाभळीला फुले आली

वाभळीला फुले आली, घाई करा बाई
अपरूप वेळ अशी पुन्हा पुन्हा नाही

पुसा डोळ्यांतले पाणी
दु:ख झाका नवेपणी
काट्यांमधे अडकला सोडवा पदर
तडकली तरी जपा जरीची कुसर

असे होते कधी तरी
सुख लागते जिव्हारी
अशा वेळी दाबूनिया ओठांवरी दात
पिचलेल्या बांगडीचा लपवा ग हात

किती जन्म गेले असे
फूल बाभळीत हसे
कुणी कुणी दु:खालाच सुख म्हणतात
कुंकवाच्या चिरीखाली जन्म रेखतात

आज नवलाची वेळ
सोनपिवळी बाभूळ
फुलातला मध करी काळा काळा डंख
तरी मोर नाचे उरी, झळाळतो पंख

११.५.१९८९

## परागंदा

ह्या इथे—
इथेच काल सकाळी कोवळ्या सूर्याने
जेव्हा पलीकडच्या टेकडीच्या कुशीतून डोके वर उचलले
तेव्हा भुरभुरत्या किरणांचा एक गुच्छ
माझ्या केसात अडकला होता,
पाणी रत्नासारखे चमचमत उसळत होते
आणि फेकलेले जाळे ओढून घेणाऱ्या कोळ्याची उत्सुकता
पंखांवर मिरवत एक बगळा नदीकाठाशी संथ उतरला होता,
या इथेच.

पूर्वेच्या वाऱ्यावर उडत चालली होती हारीने
मागची सगळी सुखदु:खे, स्वप्ने
आणि नाचत होते रक्तात किती तरी नवे आवेग,
नवे सोसणारी जशी झाडांवर नवी पाने.

तेव्हाच तर मला दिसला होता तो
पाय किंचित् रुंदावून वाकलेला जवळच्या होडीवरती
उचललेले खांदे, ताणलेले शरीर,
आणि ते त्याचे एकाग्रपणे होडी दुरुस्त करणे
मी बघत उभी चार हातांवरती,
या इथेच.

मी उभी स्तब्ध बघत, तरी त्याच्या डोळ्यांत, हातांत, कामात पसरत.
स्वत:ला असे भरभरून विस्तारता आले होते या इथेच.

कुठे आहे आज ती नदी, ते रान,
जुने क्षण उडून जाताना नव्याचे आलेले रसरशीत भान?
ते सहज मागच्या गुंत्यातून इथवर सुटून येणे
आणि आयुष्य क्षणात गोळा होत उत्कट होऊन जाणे,
— कुठे आहे?

सांग ना, कुठे आहे ती माझ्या पायांखालची
भरभरीत स्पर्शाची टणक माती?
ती गवती वासाची मिरमिरती हिरवी पाती?
आणि ते चिमटीचिमटीने झाडांतून सांडलेले
हिरव्या किनारीचे आभाळ कुठे आहे?

शब्दांतून परागंदा व्हावे काही तरी
आणि शोधत रहावे ते रिकाम्या गाण्यात भिरिभिरी
तसे ते सारे मी शोधते आहे.
— ते कुठे आहे?

४.१२.१९८८

## सरली वो रात

सरली वो रात, बाई दळण घालते
ओवी काजळझोपेची जात्या ईश्वरा सांगते

गरागरा हात, सरासरा गळे पीठ
मुके दुःख मांडीवर शांत चोखताहे मूठ

जे जे वाटे हवे, केर त्याचाच लोटते
बाई घरादारासाठी मन मोकळे करते

तिच्या मागेपुढे तिला जन्म हाकारतो
लख्ख नाकारून सारे, दिस कलतो कलतो

सांजवेळी माय हात घागरीला देते
तिच्या मुलामाणसांचे जन्म डोईवर घेते

दुडीवर दुडी, बाई पाणोठ्याला येते
पाणोठ्याला नव्हे, बाई माहेराला येते

संथ हले पाणी, स्वप्न बुडते, बुडते
चंद्र गाण्यात आला की बाई मरण मागते
रोज मरण मागते !

२६.५.१९९०

## देवतळे

कावेरीचे ते खळखळते पाणी
घाटावरच्या देवळांची असंख्य बिंबे धरणारे
आणि तिचे विस्तीर्ण पात्र
माणसांच्या गर्दीबरोबरच दगडांच्या हिरव्या-पिवळ्या
सोनेरी-केशरी रंगच्छटांनी उतू जाणारे

यांच्यामधून डोळे वाहत गेले,
तेव्हा काठावरच्या श्रीरंगाच्या देवळामधून
एका काळ्या सुघड देवकथेने बाहेर पाऊल ठेवले.

रुंद केशरी काठांची रेशीमसाडी सावरत
चमचमत्या मोरणीतून माझ्याकडे बघत
तिने पाऊल उचलले, पाण्यात बुडवले
आणि मी पवित्र इच्छांचे मंत्र आपोआप उच्चारत राहिले.

अशा देवकथा भोवती जिवंत वावरू लागल्या की
आत्म्याला कापराचा सुगंध सुटतो,
नागशिळांवरचे विळखे पडतात देहाला,
एक जोरकस, निष्ठावंत हुंकार उठतो.

कसे असते हे संस्कृतीचे घनगर्द अरण्य
एखाद्या मातीतून घमघमत उठलेले,
आणि त्यातून वाहणारे हे पाणी
माणसाच्या घरादारावर, अस्तित्वावरच दाटलेले !

कावेरीच्या रंगीत पात्रातून डोळे वाहत गेले
तेव्हा अवघ्या दक्षिण दिशेचेच एक देवतळे झाले,
माझे थेंब थेंब आयुष्य त्यात अर्पण होत गेले.

२९.१ १९८८

## गाण्याच्या जन्मासाठी

मोकळा उदासिन वारा
नभ भरून आले वरती
भिरभिरती पाखरगाणी
अन् मनात वाजत येती

गेलेल्या आयुष्याचा
मेघांवर रंग निळासा
सुखदु:खांच्या पलिकडला
स्मरणाला गंध जरासा

हळुहळू अर्थ उजळावा
शब्दांच्या घुमटामधुनी
जन्मांच्या मागुन कोणी
ये तसेच अंत:करणी

सगळेच निरखण्याआधी
मज उगाच येते भरते
भूमीत परतण्याआधी
सीतेला मिथिला स्मरते

मोकळा उदासिन वारा
नभ भरून आले वरती
गाण्याच्या जन्मासाठी
अन् मनात भिजते माती

२३.८.१९८७

## नको भेटूस अवेळी

नको भेटूस अवेळी, किती सांगितले तिने
तरी त्याचे सांजवेळी असे तिच्यापाशी येणे

नुसतेच नव्हे येणे, त्याचे येणे आणि गाणे
बंद दाराशी थांबणे, पुन्हा तेही जीवघेणे

तिने उघडावे दार, घ्यावी अंधारात उडी
याने पसरावे बाहू, दूर वल्हवावी होडी

होडी धारेला लागता, घरदिवा दूर जाई
याला गाताना पाहून, तिने बोलू नये काही

डोळे ओले व्हावे तिचे, याला नाहीच कळावे
गाणे पांघरून तिला याने हृदयाशी घ्यावे

तिने म्हणावे, नको ना, मला सोसवेना प्रीत
तरी सांजेच्या काठाशी याने म्हणावेच गीत

गाणे भरावे सुखाने, नाद दु:खाचा लागून
घ्यावे दोघांना प्रेमाने जरा जिवाशी ओढून

१९८५

## अंतर

आपल्यामधले नाते अधिक सुंदर करणे
म्हणजे आपल्यामधले अंतरच
नवनव्या बाजूंनी अधिक समजून घेणे
— हे तू मला किती तरी वेळा सांगितले आहेस.

तरी कशी मी दरवेळी नव्या उत्साहाने करते
आपल्या समरसतेपासून बोलण्याची सुरुवात ?
तू मला हवा आहेस हे सांगण्यासाठी
कशी आळवते मी तीच ती लकब तेवढ्याच उत्साहात ?
— मला कळत नाही.

पण फार दिवसांच्या आषाढी पावसानंतर
आज हे पिवळे कोवळे ऊन पडले
आणि आपल्यामधले ओले अंतर
एकाएकी चमकून उठले.
मला हवासा झालास तू आणि मी थोडी शहाणी झाले,
आपल्यामधल्या अंतरभर
मग मी माझे मनच पसरून दिले.

४.७.१९९०

## शब्द मला दे साधा

लवलव हिरवे पान झुलावे
तसेच हसणे ओले
आठवणींवर जुन्या क्षणांचे
हलके पालव झाले

सहजपणाने भिजले डोळे
मनही भिजले वाटे
गाण्याला लय त्याची जैशी
तशीच जुळली बोटे

मिळालास मज स्पर्शनिळा तू
तुला सावळी बाधा
दिल्या तुला तळव्याच्या रेषा
शब्द मला दे साधा

३०.७.१९८५

## शरद

नव्हे तळ्यात फुललेल्या कमळांच्या कोषात निजलेला
नव्हे दुधी चांदण्यात, नव्हे सोनेरी उन्हात भिजलेला,
मी शरद पाहिला हिंडताना एकटा आणि घायाळ
काटेनिवडुंगाच्या रानात, अगदी अस्थिपंजर झालेला.

शरीर उघडेवाघडे, ठेचकाळलेले, रक्तरंजित पावले
चूर झाल्या त्याच्यासंबंधीच्या सगळ्या सुंदर कल्पना,
त्या थकल्याभागल्या ऋतूने मला अगदी निराश केले.

माझी स्वैर उत्फुल्ल स्वप्ने, माझे उत्सुक तरुण हृदय....
मी पाठ फिरवली त्याच्याकडे, नादात आले पुढे पुढे.
पाहिले समोर तर,
निवडुंगाच्या टच्च भरलेल्या लाल बोंडावर
थरथरत उतरले एक पिवळे फुलपाखरू, पंख नाचवीत खालीवर,
हेलावत राहिले अधीरपणे इकडे तिकडे
आणि जराही न दुखावता ते कोवळे अद्भुत,
स्तब्ध, अगदी स्तब्ध राहिले निवडुंगाचे फडे.

मी चकित होऊन वळले
तेव्हा घायाळ शरदाने आपले डोळे शांत मिटून घेतले,
पापणीच्या कडेशी थांबले थोडे पाणी
ते कुणासाठी तेवढे मात्र मला नाहीच समजू शकले.

२७.३.१९८९

# ढग दाटून येईल

ढग दाटून येईलऽ येईल
वीज पाठून येईलऽ येईल
असा उजेड लखाख
भुई टाकणार कात
निळा डोंगर पाहीलऽ न्हाईल

घन वळेल हासूनऽ हासून
मन खोलून खोलूनऽ खोलून
थेंब येतील टपापा
मोर पाहील टकाका
झाड नवीन होईलऽ न्हाईल

कंथ शेजेशी थांबलाऽ थांबला
पूर नदीचा वाढलाऽ वाढला
वर्षाकाठी एकदाच
असा लागूनिया ध्यास
मेघ उदरी वाहीलऽ न्हाईल

मन आलेलं पानातऽ पानात
पान भिजतं पाण्यातऽ पाण्यात
ओला वास चहूकडे
हाती नवे नवे चुडे
सखा हासत येईलऽ पाहील
सखा पाऊस होईलऽ न्हाईल.

१६.६.१९८८

## दुःखाचा उखाणा

माझ्या उंबऱ्याअल्याड तुझा पाय नाही आई
तुझ्या अंगणात तरी फुले माझ्यासाठी जाई

सात कवाडांआडून मला बहर कळतो
गंध होऊन अंधार माझ्या देहाशी गळतो

मग चांदीच्या मनात थोडे गाणे मी भरते
थोडे कापूरकाजळ प्राण जाळून लावते

असे अंजन घालता मला दिसे तुझे दार
येई तुळशीमागून बाळपावलांनी मोर

तुझी जात्यातली ओवी मोर चोचीत ओवतो
चिंध्या जोडून गोधडी मला निजेला ठेवतो

मोर नाचतो दारात तुझा निरोप सांगतो
तुझ्या दुःखाचा उखाणा माझ्या ओटीत सांडतो

१७.११.१९८२

## निराधार

माणसांपर्यंत पोचण्याच्या
वाटाच सापडेनाशा होतात कित्येक वेळा,
अगदी निराधार वाटते.

आजीच्या सुरकुतल्या हसण्यासारखे
जगून झालेल्या खरपूस दिवसांचे बळ
किंवा पावसाने भिजून भिजून फुगलेल्या
मातीत फिरणारी रुजव्याची उत्सुक कळ
यांच्या आठवणीही दिसेनाशा होतात.

सर्जनाचे आळसावलेले ढग
फिरकतच नाहीत आपल्या एवढ्याशा आभाळात,
आणि संवाद सरसरून वाढतील
असे कोणतेही दमटपण उरलेले नसते वातावरणात.

मातीखालच्या मातीत
तगून राहतात किडामुंग्यांचे जीव
तसे तुझे अस्तित्व मनातळी अजून असेल
ही माझी समजूतही मग आहे-नाहीशी होते
आणि अगदी निराधार वाटते.

५.८.१९९०

## शेंगा खुडताना

शेंगा खुडताना बाई वेल खालीवर झाला
दाट हिरवासा वास थोडा बोटांवर आला

झिरझिर झरे पाणी, सुखदु:खापार गेले
बांध फोडून मनाचे आत दिगंत वाहिले

खोल ओलावले ऊन, सोनावळीत घळले
आणि मुठीचे पाखुटे काही शकून बोलले

आली सारवट गाडी, उभी आंब्याखाली झाली
कुणी हळदपायांनी गर्द हरळीत गेली

ओला चुडा, लाल कुंकू, तशी जास्वंद फुलून
मळा भरल्या अंगाचा, त्याचे तुऱ्यावर मन

झोका काढावा आभाळी, पाय भुईला लावून
जीव फेकते तोऱ्यात जशी माहेरवाशीण

२३.९.१९८९

## माझ्या मित्रा

ऐक ना,
मला दिसते नुसते चमकते अपरंपार आभाळ,
अलीकडे दाट काळ्या रात्रीची शांत झुळझुळ,
बासरीच्या एखाद्या माधवी स्वरासारखा
तीव्रमधुर तिथला वाऱ्याचा वावर
आणि मुक्त असण्याची
त्यात एक मंद पण निश्चित ग्वाही.
कितीदा पाह्यलेय् मी हे स्वप्न, झोपेत आणि जागेपणीही !

आज तुला ते सांगावेसे का वाटले कळत नाही
पण थांब, घाई करू नकोस.
अर्धे फुललेले बोलणे असे अर्ध्यावर खुडू नाही

हे ऐकताना हसशील, तर मर्द असशील;
स्वप्न धरायला धावशील माझ्यासाठी,
तर प्रेमिक असशील,
समजशील जर शब्दांच्या मधल्या अधांतरात
धपापतेय् माझे काळीज,
तर मग तू कोण असशील ?

स्वप्नच होशील तर परमेश्वर असशील,
हाती देशील तर पती असशील,
आणि चालशील जर माझ्यासोबत
त्या उजळ हसऱ्या स्वप्नाकडे
समजून हेही, की ते हाती येईल, न येईल
पण अपरिहार्य माझी ओढ, माझे कोसळणे, धापत धावणे
आणि माझा विश्वास, की माझे मलाच लढता येईल,
तर मग तू कोण असशील ?

— मित्र असशील माझ्या मित्रा !

१३.३.१९९०

## तुझे वेगळे भविष्य

अंगणातल्या चिखलात मनसोक्त खेळताना
मधेच पाहतेस तू माझ्याकडे मान वर करून
आणि झग्याचा घेर आठवणीने उचलून पोटाशी घेत
झिपऱ्या सावरतेस, सारे दात दाखवत हसतेस.

केवढे हवेसे वाटते तुझ्या डोळ्यांत खिदळणारे ऊन !
तुझा संपूर्ण भविष्यकाळ थुई थुई नाचतो तुझ्या चेहऱ्यावर
निर्भर, विश्वासू हसू होऊन !

तुझे ते निर्धास्त बाळपण पाहून क्षणभर सुखावते
एकाएकी दचकते.
मला दिसते तुझी सावली सोनुले,
ती अजिबात तुझ्यासारखी नसते.

असते किती तरी मोठी, वेडीवाकडी पसरलेली,
अंगणातल्या खाचखळग्यांनी फाटलेली,
काळीठिक्कर पडलेली.

माझ्या खंती, माझी घुसमट, माझे भाबडे अडाणीपण
माझ्या माथ्यावरचे निर्बुद्ध ओझे, माझे अकारण दुबळेपण...
सारे माझेच लपेटलेले जिच्यात, अशी कुरूप सावली
मी पाहते...पाहतच राहते, ती तुझ्यापासून कशी उमटली?
मी भांबावते, चिडते अचानक, ओरडू पाहते,
'तो झगा घे खाली, अशी बसू नकोस,
ये इकडे आधी, मुलासारखी नुसती उंडारू नकोस.'

पण अडकतात माझे शब्द घशातच,
मी आवंढा गिळते,
तुझ्या डोळ्यांतले ऊन छान खिदळत असते
अन् तुझे वेगळे स्वतंत्र भविष्य
तुझ्या चेहऱ्यावर थुईथुई नाचतच असते.

२५.५.१९९०

## या इतुक्या जवळपणी

व्रण तसेच देहावर
ओसरत्या शिशिराचे
दिवस असे वहराचे

वर हिरवे ऊन, तळी
गवत पिके सुकलेले
हृदयावर झुकलेले

नवतीच्या पाण्याचा
स्पर्श कसा सलणारा
दु:खाशी घळणारा

वाट पायफसणीची
अवघड ही मनवळणी
या इतुक्या जवळपणी

१०.३.१९८५

## नात्यांमधून रुजताना

उन्हापावसाच्या हातांनी वाढतात
अंगणातली रोपटी चहूकडून
तसे आपण रुजत जातो नात्यांमधून.

आयुष्य वाट देते की अडवते
असा प्रश्न नसतो सहसा आपल्यासाठी.
ते असते आपल्यापुरते– जशी माती.

माणसाने माणसाला दिलेला विश्वास,
तसे झऱ्यांचे उगम भेटतात अंधारात
आणि मुळे ओलावतात.

सापटीत दडलेला नाग निसटावा
तशी कोरडी रखरखही कधी येते—
हृदयाच्या आसपास सारे उजाड होते.

पण नव्या उमेदीची पानफूट आठवू नये
अशा वैराण काळातही
आत हलत असते एक धमनी हिरवीशी
नात्यांमधून रुजताना आपण दाखवलेल्या मनःपूर्वकतेची.

५.३.१९८४

# राघू अंगणात आले

राघू अंगणात आले, तिच्या आंब्याशी थांबले
दूर देशीचे आभाळ त्यांनी पंखांत आणले

दूर देशाची ग वाट जाते डोंगरामागून
सांजवेळाच्या उजेडी दिसे अधूनमधून

राघू तिथून आलेले, पंख पाचूचे ल्यालेले
त्यांच्या पायांत घुंगुर कुणी नाजुक बांधले

राघू डाळिंबाशी गेले, काय बोलले त्याच्याशी ?
तिच्या ओंजळीत आल्या गर्द माणकांच्या राशी

हिला काय होते असे थवे राघूंचे आले की
हट्ट बाहुलीचे सारे विसरते एकाएकी

खेळ ठिक्करपाण्याचा अर्धामुर्धाच थांबतो
उगाचच वाऱ्यावर जीव भुरभुरा होतो

सारे गाण्यागोष्टींतले भास खरेखुरे होती
झिळमिळत्या उजेडी पंख मोराचे हालती

परीकथेतला देश, राघू आलेले तिथून
नाही माहीत कुणाची हाक मधाची घेऊन

कोणी नसते यायचे, कले सांजवेळ आता
तरी येरझारा हिच्या, काही कारण नसता

आत्ता कुठे हिच्या उरा नख शब्दांचे लागले
कुणा ठाऊक जन्माचे काय होतील सोहळे !

२१.५.१९९०

## ओळखीच्या पार पलीकडे

ओळखीच्या पार पलीकडे पोचले आहे आख्खे गावच्या गाव
हे घडले तरी कसे आणि कधी ? कळलेही नाही.

बदलली नाही आम्ही राहत्या घराची जागा
की फुंकून टाकल्या नाहीत पिढीजात जमिनी
परक्या शहरी शिकणाऱ्या पोरांसाठी,
आणि नेहमीच खुल्या होत्या जिवाच्या वेशी
नोकरीधंद्याला दूर गेलेल्या नातलगांसाठी.

मग कसे बदलत गेले गाव, कसे सरकत गेले
अनोळखी प्रदेशाकडे ?
वाळवी लागावी तसे, कसे पोखरत गेले इथले जुने वाडे ?

अंगणे भरलेली पोरांनी, कट्ट्यावर बाप्यांचे अड्डे असायचे
मुसळाचे घाव घालताना माजघरात,
घामाने भिजायचे गाणे, शेजीबाईच्या हसण्यात मिसळून यायचे,

नदीकाठाशी बांधलेल्या निवांत नावा,
वाळवंट रंगीबेरंगी पदरांनी फडफडून जायचे,
देवळातल्या घंटांचा गार आवाज घुमत जायचा मस्तकापर्यंत
तेव्हा मशिदीच्या घुमटाचे पारवे गूढ बोल लागायचे.

अलीकडेपर्यंत होते ना हे दोन श्वासांच्या दरम्यान,
मग आज कसे झाले आहे सारे सुनसान स्मशान ?
बंद घरे, रिकामी अंगणे, संवाद तुटलेले सर्वांचे,
नदीच्या पाण्याला कुजलेल्या प्रेतांची दुर्गंधी
देवळा-मशिदीच्या परिसरात हे आवाज कसले ?
बंदुकीच्या फैरींचे ?

आख्खे गावच्या गाव गेलेले उठून एका अमानुष प्रदेशात
जिथल्या विषारी हवेत गुदमरताहेत श्वास
आणि रक्तात दबा धरून आहे एक हताश भय
सावकाश, अगदी सावकाश.

२४.४.१९८९

## चव मनाची घेताना

हवे हवे म्हणताना सुख आले असे काही
सारे सोसलेले त्याने पुन्हा नवे नवे केले

दोड्या पेरवाला जसे नख पिकलेपणाचे
तसे तुरट ओठाशी हसू खट्टेमीठे झाले

अशा कातर वेळेशी फांदी लववून जरा
चव मनाची घेताना आत दाटूनसे आले

२३.९.१९८९

[library stamp with handwritten accession number]

## चंद्र निजेवर आला

चंद्र निजेवर आला
थोडी पापणीत ओल
अर्धी जाग वेढूनिया
पाणी पाझरते खोल

चंद्र निजेमधे आला
स्वप्न पाण्यावर हाले
साता जन्मांचे उमाळे
जीव भरूनिया आले

चंद्र निजेखाली गेला
कुठे स्वप्न, कुठे पाणी ?
थोडी मनापाशी गाणी
थोडी भिजट पापणी

१.१०.१९८२

## जमीन उत्सव करतेय

जमीन उत्सव करतेय.
हिरवा चुडा ल्यालेल्या वेली दारी लवलवताहेत
आंब्याफणसांनी सावल्यांचे मांडव सुगंधी केले आहेत
वस्तीला आलेल्या उन्हाचे जरीपदर इथे-तिथे झळझळताहेत
अन् ओंजळभर ओल पाहून किडामुंग्यांचे जथे मजेत फिरताहेत.

परागंदा झालेल्या पाखरांचे थवे परत आले आहेत
राघूंच्या ओठांवरचे इशारे रंगेल होताहेत
साळुंक्यांचे पिवळे पाय नव्या पोपटी पालवीवर थरकताहेत
अन् वाहत्या पाण्यावर मनातले हेतू नितळ खळखळताहेत.

उतरत्या सांजेवर घारीची उंच दीर्घ हाक भिरभिरतेय
जमीन उत्सव करतेय.

जरा शांतता आहे रानाच्या या कोपऱ्याला
काय आठवत असेल या गावकुसाबाहेरच्या प्रदेशाला ?
गेल्या विनपावसाच्या ऋतूमध्ये माना मोडून पडलेली झुडपे
आणि कोरड्या तळमातीने उघडयावर आणलेला
जमिनीखालच्या संसाराचा निराश्रित पसारा ?
पाण्याविना तडफडणाऱ्या प्राण्यापाखरांचा जीव शोषून घेणारा
उन्हाचा क्रूर, सैतानी चेहरा ?

निमूट सरकून जाणाऱ्या पानगळीसारखे
सुजाण दु:खाचे आयुष्य
की उंचावल्या हातांना नाकारणाऱ्या कृष्णमेघासारखे
अस्तित्वाच्या वंचनेचे अर्थ ?
या निश्चल रानप्रदेशाला खरेच काय आठवत असेल ?

मी या प्रदेशाच्या श्वासात मिसळू पाहतेय...
— जमीन उत्सव करतेय.

१.१.१९८४

## आले भरून स्वतःत

लक्ष येरझारा झाल्या
हृदयाच्या आगेमागे
दिवेलागणीच्या वेळी
घर ठेवियले जागे

दिवा लावून पाहिले
नवे अंधाराचे रूप
आणि प्रार्थनेला दिले
गर्द काळजाचे दुःख

आले शब्दाशी मी पुन्हा
आले भरून स्वतःत
आता चाहुलीने तुझ्या
आत होऊ दे आकांत

१२.११.१९८२

## अनुच्चारित

किती जिवलग असते
एखाद्या सुंदर अनुच्चारित गोष्टीचे
आपल्यासोबत दूरवर येणे !
किती अवघड असते !

उच्चारणाहूनही लोभस
असतात कधी कधी उच्चारणाचे आभास.

जिवापासचा भुलवा घमघमत उठवायचा
अन् पुन्हा तो कल्लोळ जिवापाशीच रोखायचा,
हळूहळू नादच जडतो या प्राणांतिक आनंदाचा.
ओठ हलवायचा, थांबवायचा
शब्द मनवायचा, मिटवायचा.

उन्हात धरलेल्या बोटांमधून झिरपावा लाल उजेड,
तसा त्या अस्तित्वाचा लोभ पसरत राहतो,
अन् कोरांटीच्या तळामधला चुपावासा मध,
तसा जगण्याच्या मुळाशी थेंब थेंब गोडवा साठत जातो.

१.१२.९०

## असा तसा येतो वारा

असा तसा येतो वारा ऐकतच नाही
सांजवेळी सावल्यांच्या घरभर होई.

घरभर वारा, वारा पावसाआधीच
टपोरे जांभूळ तसा त्याचा पिका वास.

टपटप जांभळाचा रस ढगावर
निथळेल ढग, सारे सारे भिजणार.

जिवावर उठलेली धूळ निवळेल
मोतीचूर थेंब थेंब रक्त नाचवील.

थेंबातली निळी माया, निळे तिचे गूढ,
जागवेल खोल पुन्हा तुझी नवी ओढ.

पुन्हा तीच धूळधाण, प्रलय तो पुन्हा
एका शपथेशी जन्म कोसळतो पुन्हा.

नको किती म्हणू, वारा ऐकतच नाही
तुझ्यासारखाच साऱ्या मनभर होई.

१८.५.१९८९

## पुष्कळ सोपे होते जगणे

सहज साधेपणाने ठेवता यावे मनापाशी मन
त्याने किती सोपे होते जगणे !

हिवाळ्यातल्या कलत्या संध्याकाळी
मग भरून जात नाही पदर नुसताच पाचोळ्याने
त्यावर चमकत राहते रानमधासारखे तांबूस ऊन
आणि आठवता येते घरातल्या चुलीजवळचे
ऊबदार वावरणे.

सहज साधेपणाने ठेवता यावे मनापाशी मन
त्याने पुष्कळ सोपे होते जगणे !
सांगता येते न लिहिलेल्या कवितेच्या जन्मापूर्वीचे सारे
पाकळी उलगडून अर्धी,
मिरवता येते जिवलगांच्या सहवासाची जरी झगमग
एकटेपणा अधिक तीव्र होण्याआधी.
आणि उचलून पाहिला तर दिसतो काळोखाचा चेहराही
हसणारा निर्मळ समजुतीने,
—पुष्कळ सोपे होते जगणे !

२१.१०.१९९०

## एक लसणारी वाट

एक लसणारी वाट, एक वादळाचे दार
एक रक्तात भिंगरी, एक वेड काळेशार

वेड लपेटून जावे, जावे वादळापल्याड
रक्तलाल पावलाला एका शपथेची ओढ

थांबे शपथेशी जरा गूढ अज्ञाताचे वारे
ज्याच्या पदरात लाख सोनपिवळे निखारे

फुले निखाऱ्यात एक गर्द जांभळेसे फूल
फूल काळजाचे, त्याला निळी जहराची भूल

कशी निळीकाळी भूल, तिला मधाचा ग वास
जसा आयुष्याचा कंद लागलाहे पिकायास

२४.५.१९८९

## नवे निराळे होण्यासाठी

आता भागणार नाही नुसता कवितेत रुजवून
कोवळ्या गवताचा वास,
शब्दांमधून फुलफांद्यांना बहर आणून चालणार नाही.

तसा सतारीच्या तारांमधून वळत निघेलही
एखाद्या चिमण्या गाण्याचा स्वर लोभस,
किंवा रंगाच्या एखाद्या चपळ फटकाऱ्यातून
धावत निघेल टपोर डोळ्यांचे हरीणपाडस–
हे जरी खरे असले, तरी पुरे ठरणार नाही.

चित्रासाठी, गाण्यासाठी, नवे निराळे होण्यासाठी,
श्वासाइतकेच निकडीने
टिकवावे लागेल रान बाहेरचे आणि आतलेही,
नांगरावी लागतील शेते,
आणि अडवावे लागेल पाणी, जमिनीवरचे आणि आतलेही.

असाव्या लागतील पाणथळ जागा आणि गवती कुरणे,
असावी लागतील झाडे
मायाळू फांद्यांवर फळांफुलांसकट पाखरघरटी सांभाळणारी,
अन् असावी लागतील माणसेही
पाण्यासाठी, प्राण्यांसाठी, झाडांसाठी, गाण्यांसाठी
जीव धरून राहणारी,
स्वतःमधून वाढता वाढता दुसऱ्यासाठी जगणारी.

५.१२.१९८९

## नव्या मनाची घडी मोडली

नुक्ती नुक्ती विझली होती फागामधल्या होळीची धग
चैत्रखुणांनी मिटली नुक्ती रंगामधली ओली तगमग

शिरिषफुलांच्या मळल्या वाटा, येउन गेला झडझड पाउस
पहाटक्षितिजावरती भिजला सूर्य कोवळा सोलिव तांबुस

सगळे काही फेडुन तेव्हा एक झाड निष्पर्ण मोकळे
लसलसत्या गुच्छाला पिवळ्या हृदयावर टाचून हासले

जुनी वाळली वर्षे मीही दूर फेकली प्राणपणाने
नव्या मनाची घडी मोडुनी आज भेटले तुला नव्याने

७.४.१९८९

## ऋतू मनाहून निळा

आला भरून पाऊस, तुला हवीशी ही हवा
संथ सुजाण सुखात, ऋतू निथळतो नवा

ऋतू जगावेगळा हा, ऋतू मनाहून निळा
त्याच्या लावण्यगुणाच्या सखी वेगळ्याच कळा

कुणासाठी हा बहर त्याचा शोध नको घेऊ
जीवे भोगताना त्याला असे नाव नये देऊ

जे जे ओंजळीत येते, ते ते आपुलेच असे
तुझ्या-त्याच्या पार सई, त्याचा अर्थभार पोचे

टोचताना दुखते ग, तरी दुखू दे ना जरा
मग झळाळतो बघ शुभ्र मोरणीचा हिरा

तुला हवीशी ही हवा, ऋतू निथळे दारात
दे ना पावसाच्या हाती तुझा ऊनओला हात

१९८६

## एक एवढेसे सत्य

एक कुठले तरी एवढेसे सत्य
लहान पिवळ्या फुलपाखराच्या पंखासारखे,
तळहातावर ठेवून ती थरथरत म्हणते,
' पहा, ते जगणार नाही ! नाहीच ना ? '
आणि दु:ख असह्य झाल्यासारखी
आपणच मान टाकते.

मी वाचत असतो वर्तमानपत्र,
ते बाजूला करतो. हसतो. पुन्हा वाचू लागतो.
एवढ्यातेवढ्या गोष्टींचा बाऊ मला मुळीच मान्य नसतो.
किती तरी महत्त्वपूर्ण घडामोडी— देशातल्या, देशाबाहेरच्या
माझ्यापुढे आकार घेतात.

मी व्यग्र. हळुहळू ताणले जाते मन धनुष्याच्या दोरीसारखे,
स्वीकारता न येण्याजोगे जगण्याचे पर्याय
मला घेरून टाकतात.
केवढ्या तरी लहानमोठ्या घटनांची जगड्व्याळ चक्रे
फिरू लागतात माझ्याभोवती,
भीतिदायक होते हळुहळू त्यांची अनाकलनीय गती.
माझ्या मर्यादेबाहेरचे ते अफाट जग
माझ्या अस्तित्वाचे सोयर नसलेले
आणि मग अगदी माझे असे आहे तरी काय ?
मरत जाणारे प्रत्येक लहानसे सत्य,
ज्यावर विसंबले आहे तिचे मन भोळे ?

मी चमकून पाहतो,
तिचा तळहात मोकळा, मला खिजवीत
अन् ती तर आता डोळे मिटून निपचित.

१७.६.१९८८

## ओटीत चंद्र माझ्या

पाण्यात चंद्रिकेच्या झुलता फुलार वेली
हृदयात गंध माझ्या रे दर्वळून आले

केसांत वारियाची फिरता हळूच बोटे
होऊन मोकळे ते स्कंधी रुळून आले

मी बोलले न काही, नुसतेच पाहिले मी
भाषेविनाच ओठी गाणे जुळून आले

विसरून जायचे जे होते जिव्हार नाते
घनगर्द रात्र बनुनी ते साकळून आले

नव्हतेच ठाउके जे असले कधीच काही
एका मिठीत सारे मजला कळून आले

पदरात झाकला मी अन् चेहरा जरासा
ओटीत चंद्र माझ्या रे झळझळून आले

१९८५

## मी काय करू ?

तुझ्यामाझ्यामधल्या या नात्याकडे पाहताना
अगदी खचून गेले आहे मी !

आठवतं,
किती लोभसवाणा दिसला तेव्हा
याचा तान्हा गुलाबी चेहरा ?

ते इवलंसं ऊबदार गुंडाळं,
लडिवाळ लोभाचं, लाडाकोडाचं,
तू नि मी किती भरभरून वाढवलं,
रंगून सर्वस्वानं आणि गुंतूनही,
अगदी तुडुंब स्वागत केलं त्याचं.

अन्
वाढत जाता जाता किती बदलला रे याचा चेहरा !
किती परका झाला, किती नवा !
या स्वतंत्र सरसर वाढलेल्या रासवट नात्याकडे पाहताना
कसा वाटतो आहे एक चमत्कारिक दुरावा !
आहे का रे हे आपलंच ?
मग मिळत कसा नाही मला याच्या एकाही स्पर्शात,
याच्या हसण्या-बघण्यात त्याचा जिवंत पुरावा ?

आपलं काय काय शोषत हे विचित्र वाढलं आहे,
याचा विचारही मला करवत नाही
याच्या बेदरकार कपाळावर उमटलेला
अशाश्वतीचा क्रूर टिळा मला सहनही करता येत नाही.

अगदी खचून गेले आहे मी.
मी काय करू ?

२.१२.१९९०

## सईबाई ग

सईबाई ग सईबाई ग, तुझा बंगला मोठा
सईबाई ग सईबाई ग, तुझा राणीचा ताठा
उठतेय् माडी न् झुलतेय् गाडी
तुझ्या राजाचा पसारा मोठा, तुझा राणीचा ताठा

सईबाई ग सईबाई ग, तुझं मोत्याचं न्हाणं
सईबाई ग, सईबाई ग, सोन्याचांदीचं लेणं
रेशिमसाडी न् फुलांची वाडी
तुझ्या राजाचा इशारा मोठा, तुझा राणीचा ताठा

सईबाई ग सईबाई ग, तुला कशाला उणं ?
सईबाई ग सईबाई ग, सारं राजाचं देणं
काय त्याला हवं न् तसं वागावं
तुझ्या राजाचा दरारा मोठा, तुझा राणीचा ताठा

सईबाई ग सईबाई ग, का ग डोळ्यांत पाणी
सईबाई ग सईबाई ग, काय झाली कहाणी
बोलू नको काही न् कळलं ग बाई
तुझ्या राजाचा तुरुंग मोठा, तुझा पोकळ ताठा !

५.७.१९८८

## धुक्यात विरते गती

धुक्यात विरते गती, हळुहळू भोवळ चढते मजला
या झाडांच्या पानांमधुनी गळे गारवा ओला

शिशिर जरासा वाकुन घेतो बहर खुडुनिया सारा
झाडांच्या प्राणांत तरी पण लपला हिरवा तारा

या ताऱ्याचे तेज कोवळे मुठीत माती धरते
रानझऱ्याच्या उगमापाशी हृदय वाहुनी येते

परदेशी गेलेला पक्षी पुन्हा यायच्या वेळी
हवेच फुलपानांचे स्वागत, हव्याच हिरव्या वेली

म्हणुन उन्हाचे दाणे वेचुन उवेत ठेवत जातो
शिशिराच्या घनगर्द मिठीतुन वारा निसटुन येतो

जे जे हरपुन गेले माझे त्याचे डोळां पाणी
समजुत घालत वारा म्हणतो, गा हृदयाची गाणी

मी मातीने भांग भरुनिया जाते वाऱ्यापाठी
झाडांमधला हिरवा तारा घेते शब्दासाठी

५.२.१९८८

## भर पावसात

भर पावसात ती बाई आलेली दारात
खांद्यावरचे तान्हे पोर उघडेबंब
कळवळून रडत असावे असे मला प्रथम वाटते,
पण ते रडत नसते.

टिपेच्या आवाजात किंचाळणाऱ्या आईचा
उघडा ओला खांदा चोखत
डोक्याला गुंडाळलेला प्लॅस्टिकचा कागद ओढत
बेफाम भिजताना ते निमूट असते.

पावसाच्या अमानुष झडझडीवर चरे ओढत
ओरडत राहते त्याची आई गुराप्रमाणे
तिचे अर्धे-उघडे शरीर, झोडपणारा पाऊस
आणि तान्ह्या पोराचे ते शांत पडून असणे,
किती भयकारक ! किती केविलवाणे !

थांब म्हटले तरी ती थांबत नाही
दिलेल्या साडीची चौघडी पोरावर टाकत
ती निघून जाते भर पावसात
सरी कडकडून कोसळतात. कोसळत राहतात.

केशरी ज्वाळांची ऊब अंगभर माखून घेत
मी पडलेली डोळे मिटून माझ्या घरात
बघत राहिलेली आत, मनातल्या मिट्ट काळोखात.
येत असते कोणी आतून, मला हालचाल दिसते
धडपडणारे, सरपटणारे ते पुढेच येत राहते.

रोखलेला माझा श्वास, मी प्राण गोळा करून पाहते
कोसळणाऱ्या सरीवर सरी, वीज तडफडून आवाज करते
ते येते अखेर समोर, कोंडलेला श्वास मी मोकळा करते
अन् घामेजल्या तळहातांनी त्याला हृदयाशी घट्ट धरते.
हे माझे माझ्यातून आलेले !
ओले, खरचटलेले, दम लागून धपापणारे,
सगळे माझे, माझेच असलेले !

मी आसासून उचलते वर त्याचा इवला करुण चेहरा
तर दिसते ते एक फिरस्ते भिकारी दु:ख.
मी तडफडते. मोवळते.
ते माझे गाणे असते, की ' तिचे ' मूल असते ?

२६.९.१९८८

## जरी तुला कधी न बोलले

जरी तुला कधी न बोलले
तरी प्रिया तुझीच जाहले

गंध या हवेत दाटले
समजले, ऋत भरातले

वंशवेणु नादता जरा
तुझेच त्यात नाव ऐकले

बिलगतो धुक्यास गारवा
तुझे तसेच स्पर्श भोगले

फुलुन ये तुझ्या घरी जुई
हृदय मी तयात माळले

माझी मी न राहिले प्रिया
जन्म मी तुलाच वाहिले

१९८६

## ओले उदास गगन : १

ओले उदास गगन, तिचे वनवासी मन
नाही जवळ सजण

तिने धाडल्या दिशांत रानमोरणीच्या केका
त्याला पोचेनात हाका

कृष्णमेघांत वाजले पंचप्राणांचे घुंगुर
नाद जाईना का दूर ?

फुलवासाच्या रेषांनी, नादचित्र रेखलेले
त्याला नाहीच कळले

आता आयुष्य झोकले, तिने शब्दांच्या पाण्यात
कंथ येईल गाण्यात

१८.२.१९८८

## ओले उदास गगन : २

आले गोदेच्या कुशीत, ओले उदास गगन
तिचे वनवासी मन

दोन जिवांची ती आता, तिला चढेना चढण
नाही जवळ सजण

भगभगते कपाळ, तिला कुंकवाचा भोग
दिला सजणाने डाग

असे अरण्या वनात, तिने कुणापास जावे,
दु:ख कुणाला सांगावे ?

ओठ दातांखाली घेत, तिने सावरले सारे
जरा झाकले निखारे

थोडे पाखरांनी दिले, थोडे मोरांनी धाडले
शब्द तिच्यापाशी आले

आता वाट पाहते ती, अशी दंडकारण्यात
राम येईल गाण्यात

१८.२.१९८८

## सुभद्रा

सुभद्रा होऊन जगन्नाथाशेजारी उभे राहता यावे
असे फार फार वाटले.
वाटले की, तेव्हा पूर्वसमुद्रातून वर येणारा उदयसूर्य
अगदी माझ्याच भाळावर टेकवला जाईल कुंकुमतिलकासारखा
आणि मग अस्तरवीच्या मागून येणाऱ्या
कभिन्न अंधाराचे मनात जराही भय दाटणार नाही.
वर्षे उलटत जातील, तसे मिळेल एक नवे कलेवर
आणि जुने वस्त्र कैवल्यवैकुंठात उतरवताना
मला जराही खेद वाटणार नाही.

फक्त लाकडाचा ओंडका होण्यासाठी
मन कचरत होते.
आज इतक्या वर्षांनी कळते, ओंडका होणे फार कठीण नसते
उलटणाऱ्या दिवसागणिक आयुष्यच ते काम करीत जाते.
मात्र नुसता ओंडका होणे पुरेसे नाही
कारण अशा-तशा लाकडाची सुभद्रा होत नाही.

धारण करावा लागतो लालपिवळा रंग : सोसण्याचा
निर्लेप स्वीकाराचा, कष्टांचा, प्रेमाचा
पिवळालाल, लालपिवळा– त्या रंगाने आतून उजळा
शरीरावर खूण हवी तीही पाच फांद्यांची
पंचेंद्रियांच्या एकात्म उत्कट पालवीची.

तोडून घ्यायला हवे, छिलून घ्यायला हवे
रक्त, मांस, अस्थींसाठीही व्रती रहायला हवे
बाह्य रूप असे-तसे, त्याची आसक्ती गळते
तेव्हा कुठे आत्मबळाने परब्रह्म पेलवते.

एवढे सारे होत जाईल, तर एक दिवस असा येईल
आपला ठाव न सोडताही सुभद्रा होता येईल.

१९.११.१९८८

## शैशवतारा

किती दिसांनी बहिणीचे मी पुन्हा गुंफले केस
आठवणीतुन घमघमला ग बालपणाचा वास

हलके हलके हृदयाजवळुन किणकिणले ग काय
काचेच्या रंगीत बांगड्या, आणिक छुमछुम पाय

बोलघेवड्या कथा, सखीसम मोठे डोळे त्यांचे
घेराच्या गिरकीत झग्याच्या अद्‌भुत नाच पऱ्यांचे

मी मेंदीचे हिरवे ठिपके पुन्हा हुंगले खोल
किती सुखांचे तळवे झाले गर्द लालडे लाल

आईच्या पदराचा ज्याला वास दुधाचा थोडा
त्या गाण्याचा नाद टपोरा जिवास बिलगे वेडा

आणिक मी ही अशी, उडवतो मनपाचोळा वारा
खोल तळाशी चमकत राहे हिरवा शैशवतारा

१.४.१९८८

## अवघड

मी घरातून बाहेर पडतो तेव्हा तू असतेस उंबऱ्याशी
रात्रीचा माझा सहवास माखून अंगभर
अगदी तुझ्यात रेंगाळणाऱ्या पुरुषाला, नव्या पराक्रमासाठी
तुझ्या·आकर्षणकक्षेबाहेर उदारपणे धाडल्याचा भाव चेहऱ्यावर
आणि बहुधा अशी खात्रीही की, हा येणारच आहे परत
तुझ्याबद्दलच्या नव्या ओढीने, दूर गेल्यावर.

दडपतो मी तुझा विचार, लांब जाताना, प्रहर अंगावर घेताना
ओलांडतो कुत्सित संबंध असंख्य, ठेचकाळतो जुन्याच पराभवांना
बिनमुठींच्या तत्त्वांना चाचपतो खिशातच,
रिकाम्याच हातांनी होतो सामोरा येणाऱ्या क्षणांना.

अटळ युद्ध लढतो, थोडा जिंकतो, बराचसा हरतो,
पण त्याहीपेक्षा असह्य होते मला एकट्याचे ओझे.
मी थकतो, प्रचंड थकतो.

मी सहन करतो घरी परतणे, तुझे निवळ हसणे,
तुझ्या शब्दांची तिरीप सोसतो मनावर,
सोसतो तुझे किलबिलणे.
गळून गेलेल्या हेतूंना मात्र एक तीव्र तहान लागते,
दारूच्या घोटासारखे तुझे शरीर झेपेत हवेसे वाटते.

भाग्य हे की, या उपमेबद्दल म्हणावे लागत नाही ' क्षमस्व '
तरी पण मला तेव्हा रडावेसे वाटते,
असावे वाटते तुझे मनही माझ्या मनापाशी,
तुलाही माझ्यासारखे एकटेपणाच्या यातनांचे नख लागावेसे वाटते.

कबूल करावेसे वाटते की,
फार अवघड होत आहेत गोष्टी माझ्यासाठी
आणि प्राणांतिक तीव्रपणे कळते हेही,
की त्या माझ्यासकट अधिकच अवघड तुझ्यासाठी.

३.२.१९८९

## या गंगेच्या पार

या गंगेच्या पार दिशांचे मोठे अंगण आहे
अंधाराच्या कुशीत तेथे बाळ उन्हाचे राहे

या गंगेच्या पार कस्तुरी माती आहे काळी
पाट पांघरुन आकाशाचा विणते पाउसजाळी

या गंगेच्या पार युगांच्या राया जाग्या होती
गजबजलेल्या हृदयावरती हिरवी छाया देती

या गंगेच्या पार उतरते कालपाखरू कोणी
कलिकांच्या कोषांत ठेवते भविष्यातली गाणी

या गंगेच्या पार सखी ग माझे घरकुल आहे
माझ्या गाण्यातून तयांचे बिंब तरंगत राहे

या गंगेच्या पार दाटती अरण्यमधुरा रात्री
चांदणभिजले स्वप्न सुखाचे भरती माझ्या गात्री

या गंगेच्या पार जायची धडपड करते मोठी
थकले देवा, आता माझी लाज राख जगजेठी

१.४.१९८८

## हा क्षण

पकडता येईल का मला हा क्षण मृत्यूसारखा ?
प्रत्येक उलटणाऱ्या दिवसागणिक, तासागणिक, निमिषागणिक
मी वागवते आहे जसा मृत्यूचा ठसा खोलवर
श्वासागणिक माझ्या, जसा त्याचा वास हलतो आहे खालीवर,
माझ्या गळत जाणाऱ्या इच्छा, माझे मोहरणारे निरोप,
माझे सावकाश शरण जाणे जीवनाला,
माझ्या रक्तात विरघळून चाललेले हताश कैफ –
इतक्या तीव्र धारेने धरता येईल का हा क्षण माझ्या काळजावर ?

याचे हे फिके पिवळे रंग...याचे मनाला लागून धपापणे
शिशिर आणि वसंताचे याच्यात एकत्र मिसळून जाणे
हे गोड अज्ञाताचा काटा फुललेले याचे टपोरपण
हे पिकलेपण, हे शोकमग्न रसाळपण –
धरता येईल का मला हा क्षण ?

१.३.१९८९

## फिका पाऊस

फिक्या पावसाच्या सरी चार आल्या
कशी मंद झाली दुपारी उन्हे
पहा काजळाने किती धुंद झाली
नभाची टपोरी निळी लोचने

निळ्या धूसराचे पिसे लागलेला
भरारून वारा कुठे जातसे
निळा नाद गाजे पहाडात काळ्या
नदीचे निळे रक्त धुंदावते

उठे गंध उद्दाम मातीतुनी हा
कसा इंद्रियांना मिठी घालतो
घरे-वासरे-पाखरे तृप्त व्हावी
असे दान धारांकडे मागतो.

उद्याच्या पिकाचे नवे भान जागे
नवे बीज शेतात ओलावले
रुजू घातले जे मनाच्या तळाशी
कडूगोड ते आज कोंभावले

२५.४.१९८८

## विश्वासाचा शब्द

विश्वासाचा शब्द दिलास असा की
माझ्या हृदयाशी मेघ आले

वर्षताना स्नेह तुला ना कळाले
माझे वाहून गेले काय काय

वळचणीपाशी उभी मी हताश
आता घरापास दिवा लाव

३.९.१९८८

## त्वचेचिया राना

दुरून जवळ येत येत गडद व्हायचा बैराग्याचा आवाज,
उंबऱ्याशी आई असायची पहाटेच्या झांजर उजेडात.
बैरागी गाणे मग अंगणात वाजायचे
आणि भगव्या झोळीचे तोंड आईसमोर वासले जायचे.
आई घट्ट मिटायची ओठ धान्याचा पसा झोळीत घालताना
बैरागी मिटायचा आपले स्निग्ध डोळे क्षणभर
आणि गाणे मागे ठेवून निघून जायचा–
'त्वचेचिया राना धाडू नको मनाऽ'

गाणे उधळायचे अंगणभर, गोठाभर, घरभर, मनभर,
आईची मुलगी आतबाहेर फिरत रहायची
तिचे गुणगुणणे ऐकता ऐकता निखारे फुंकणारी आई
नुसती लालबुंद होऊन जायची.

आई वेण्या करायची गुलबाशीच्या लेकीसाठी,
परकरावर कशिदा भरून द्यायची,
तिच्या डोळ्यांत घालून काजळ, लावून मोठीशी टिकली
दुपार कलता कलता तिला देवळात न्यायची,
आपले मोकळे कपाळ घासायची पिंडीपाशी
अगदी सैरभैर, अगदी काकुळती व्हायची,
अन् तिला खेच देत घराकडे चालताना पुटपुटत रहायची—
'त्वचेचिया राना धाडू नको मनाऽ'

रात्री लेकीला जवळ घेऊन गोष्ट सांगायची आई
तेव्हा धुवट पदराचा वास लेकीच्या नाकाशी थांबायचा.
गोष्टी कपिला गाईच्या, आवडती-नावडतीच्या...
अंधार हळुहळू गडदमुद्द होत जायचा.

पहाटे मात्र आपोआप जाग यायची लेकीला ठरल्या वेळेला
तेव्हा धान्याचा पसा घेऊन आई उंबऱ्याशी असायची,
अन् झांजरत्या उजेडात बैरागी गाण्याची पावले
अंगणात हळुहळू वाजत यायची—
'त्वचेचिया राना, धाडू नको मनाऽ'

२२.२.१९८९

## तुझे जवळपण

तुझे जवळपण हृदयापाशी नकळत आले
ते तेव्हांचे रोष जुने ते
सल जे काही दुखरे होते
त्यांचे झाले झुळझुळ पाणी, वाहत गेले

तूही भिजला, मीही भिजले
मुठीत गाणे झाले ओले
आपुलकीचे मेघ झरारा बरसत गेले

तुला कळाले, हिरवी राने
मला कळाले, भिजली पाने
हळुच फुलांचे रंग मनावर उमटत गेले

४.९.१९८८

## माती निकामी होते

हळुहळू धुपून जाते उमेदीचे सकस आयुष्य,
माती निकामी होत जाते.

सावकाश सैलावतात आकांक्षांची दूरवर पसरलेली मुळे,
चिवट कार्यशक्ती मंद मंद होत जाते,
खिळखिळे होतात कष्टांनी टिकवून धरलेले मूल्यगर्भ आधार,
उपद्रवी तण रक्तातली जीवनसत्त्वे कशी शांतपणे शोषत राहते
हे मातीलाही कळते.

कोणत्याच विरोधाला न जुमानता
एके काळी जोमदार वाढलेली रानदांडगी झाडे
आता वाऱ्यापाखरांच्या गोष्टींत दंग झालेली,
आभाळाचे निळे वेध आकंठ लागलेली,
अगदी आपोआप आपले मातीतले पाय विसरत चाललेली.

मातीला आपले नि:सत्त्व होत जाणे कळते, पण वळत नाही.
घसघशीत वासंतिक रंगटिळा लावून,
वळिवाचा सडसडता पदर उडवत आपले निब्बर जुनेपण ती मिरवते
उठवळपणे, पुन्हा एकदा बहराचा जोर करते,
पण आता मुळी शक्यताच नसते सर्जनाची क्षीण सुद्धा.
मातीला हेही कळते.

मग उरतो तो ओसरत गेलेल्या सुखाने कळ लागून
दुखणाऱ्या वेदनांचा निमूट स्वीकार,
आणि मागे, चकित करणाऱ्या सर्जनाच्या धडकांनी
छिन्न झालेल्या भूतकाळाचा लखलखीत विस्तार.

वांझ आयुष्यात पाऊल ठेवताना
सगळे भविष्यच किती दीनवाणे होत जाते
हेही मातीला कळतेच, पुन्हा पुन्हा एखाद्या तप्त मुद्रेसारखे
अगदी चरचरून कळते.

२२.४.१९८९

## ठिपका

समोर कॅन्व्हास कोरा, पुढ्यात रंग
मी उत्सुक तिच्याकडे पाहत
तिला मी तिचे मन रंगवायला सांगितले आहे.

वाटतें, आता ब्रश उचलण्याइतकाही धीर
असणार नाही तिला,
ती माखत राहील रंगच रंग
विस्तारत नेईल तो रिकामा चौकोन सगळा

रंगावर रंग... तुडुंब !
जुन्या भेटींचे ते सगळे कोवळे
थरावर थर थरथरणारे : ते मोकळे, ते सोनेरी पिवळे
झिम्म काजळधारेतून लुकलुकणारे ते उजाळे
रक्तातून धावणारे ते लाल-निळे...

तिने उचलला एक हिरवा, तो समुद्रतळाचा केला
आणि फक्त एक लहानसा ठिपका दिला.
ठिपका वेडावाकडा, पण जिवंत कमालीचा.
वाटले, हा एकच एक आता पसरेल सर्वभर,
मी एकाग्र पहात राहिलो अवकाश त्याचा.

नंतर मग काहीच काढले नाही तिने,
नुसती हसली
म्हणाली, ' हा तू. बाकी सारे कधीच मिटले.
एवढेच होते मनभर झालेले. '

२१.८.१९९०

## पैल श्वासांच्याच फक्त

पैल श्वासांच्याच फक्त आहे वाहून राहिले
गेल्या वळणाचे पाणी तसे आयुष्य मागले

शुभ्र शरदाचा वारा घाली उखाणे पुराणे
त्याच्या स्पर्शाने थरारे त्वचा कोकराप्रमाणे

आठवांनी ओलसर तृप्त सुगंधित माती
कळे स्थळकमळाचे, तशी डोलतात नाती

जुने सारेच झालेले नवे नव्या पाण्यामुळे
आणि शारदचांदणे मंद तयावर हाले

दूर एकट्या गावात हळू लागतात दिवे
तसा आत्ताच्या घडीत गेला क्षण क्षण तेवे

आहे आयुष्य मागले पैल श्वासांच्याच फक्त
सुख झोंबून, गळते माझे गाणे, माझे रक्त

३०.७.१९८८

# जाणीव

वर, अगदी वर निसटून येते ती वैयक्तिकाच्या गाभ्यातून
तेव्हा श्वासही असतो नेहमीसारखा लयदार
आणि दमछाक झाल्याची किंचितही खूण नसते चेहऱ्यावर.

मग ती उचलते एक वेल्हाळ पाऊल
आणि समष्टीच्या मातीवर टेकवते,
बघता बघता दूरवर फैलावतात दिशा
आणि आभाळ उंच उंच जात अनाद्यंत होते.

वारा भणभणून फिरत जातो अंतर्मनाच्या अरण्यात
तेव्हा क्षणभर थरथरते ती नखशिखान्त,
पण मग ऊन अंधाराच्या गळ्यात गळा घालते
आणि ती संपूर्ण आत्मविश्वासाने हसते.

मुक्त संवेदनांचा पसारा मोकळा करीत
ती आदिमाया जाणीव नाचू लागते दोन्ही हात लववून
एकदा एक पाऊल उचलून, एकदा दुसरे पाऊल वेळावून
तेव्हा सृष्टीच्या धमनीमधून अज्ञात दुःखांची उघडमीट होते
आणि गाण्याचे हृदय कोवळ्या आनंदाने भरून येते,
हळुहळू...अगदी...भरून येते.

२९.१२.१९८८

## नख एकटेपणाचे

नख एकटेपणाचे जेव्हा लागते गळ्याला
तेव्हा सोसलेली दु:खे पुन्हा येतात फळाला

सया पाठमोऱ्या ऱ्हाव्या निळ्या सुखाच्या पल्याड
पाठी धावता आपण, त्यांनी लावावे कवाड

तसे निसटती क्षण, होती ठार अनोळखी
जशी माणसाची वैरी होते दूरदेशी माती

माया लावोनीही कधी फार दुरावते पोर
धागे ओढतो जिवाचे तसा मागल्याचा भार

सारे धूसर धूसर, काही कळेनासे होते
मुक्या एकांताचे पाणी जीव भरून वाहते

आतबाहेर ना कुणी, दु:खसजग हे मन
अशा उदासीत आता शब्द यावा उजळून.

८.१.१९८९

## घरगुती वासाचे गाणे

कशा सांगाव्या तुला ऊनमायेच्या नि धारोष्ण दुधाच्या गोष्टी
उघड्या रानात या शेकोटीपाशी ?

विझत जाते आहे हळुहळू पेटती आग.
मावळत जाते आहे लाकडाच्या नसांमधली लालबुंद धग,
निवत जाते आहे.

खरमरीत पेट घेईल असे जळण
आता मिळणार नाही या ओल्या दुष्काळानंतर.
दलदल उग्र पलिकडची, माणसाच्या भौतिकतेसारखी
समृद्ध कुजून फुगलेली,
तिचा झाक मारणारा विषारी वास
सणसणून येतो आहे इथवर.

आता तुला एके काळी माझ्या घरालगत बहरलेल्या
संत्र्यांच्या बागांचे रंग सांगू ? सांगू मोसमाचे केशरी प्रहर ?
उष्ण गोड आच लागल्यासारखी पिवळी हवा
तेव्हा हेलावत रहायची सर्वभर,
तुझा विश्वास तरी बसेल का यावर ?

किती सुन्नपणे गळतो आहे रोगट संधिप्रकाश,
विनाशाच्या हाका किती आर्त भिरभिरताहेत,
दूर सरकत जाताहेत सुहृदांचे श्वास,
स्वप्नांचे डोळे धुळीने भरून जाताहेत.
अजून धुगधुगतो आहे काळाचा आत्मा
पण त्याची रानगवती पावले ओलीने सडताहेत.

हे रान नाही आता पाखरांना राहण्याजोगे,
ओल्या दुष्काळाचा फैलावता रोग इथे सर्वभर
तू साठवू पाहतो आहेस विझणाऱ्या निखाऱ्याची ऊब,
कसे सांगावे तुला ते तेव्हाचे मध्यंतर ?

विझलीच आहे बघ खरे तर शेकोटी
अशात, या वैराण संध्याकाळी
तुला कसे सांगू जुने दिवस आणि त्यांचे मोहरत जाणे ?
तुझ्यासाठी किती भरून आले आहे माझे हृदय
आणि उरले आहे जुन्या घरगुती वासाचे
माझे एकुलते एक गाणे.

९.२.१९८९

## प्राणांच्या ऐलपैल

सांध्यवेळ ओली
तिमिरातुन आली
दूर कुठे विजनातच दीप लागले
प्राणांच्या ऐलपैल काय जागले ?

हलकासा वारा
एक लख्ख तारा
गडद निळ्या पाण्याशी स्वप्न लांबले
प्राणांच्या ऐलपैल कोण थांबले ?

निसटुन जे गेले
ते फुलुन आले
स्मरणातुन त्याचे मधुनाद गाजले
प्राणांच्या ऐलपैल काय वाजले ?

हृदयाशी आले
शब्द जरा ओले
झिळमिळत्या गाण्याशी मोर नाचले
प्राणांच्या ऐलपैल कोण हासले ?

१२.१०.१९८८

ठाणे
शाखा

## पुरता तू छद्मी

नाही दिले तुवा । संवादाचे बळ
तरी जन्मखूळ । कासया हे ?

देणे जरी सर्व । शून्य अनुभव
निर्माणाची हाव । का रे दिली ?

ऐकणेच होते । निरर्थाची गोष्टी
संवेदनासृष्टी । आत केवी ?

प्रश्नांची उत्तरे । उगा मागते मी
पुरता तू छद्मी । ठावे मला

एवढेच आता । ऐक माझी हाक
आणि कान झाक । निलाजऱ्या

१९८०

## उच्छाद

वाघानं उच्छाद मांडिला बाई किंजाट रानाला सखू
नाव हळुहळू चालली माझी पल्याड काठाला सखू

रातीत ओढली, माणसे फाडली
गाव भेदरले उभे
वस्तीत, मळ्यात येईल कधी हा
नेम ना कोणी सांगे
आरोळ्या घुमती अवेळी रानी, वैरी हा मातला सखू

ऐकल्या ओटीला वडिलधाऱ्यांच्या
गोष्टी मी येता नि जाता
तरुण पोरींना देवळा-पाराला
कोणी ना धाडील आता
एकटी दुकटी कोणी ना जाईल नदीला पाण्याला सखू

पल्याड काठाला शेतात, राईत
कुठे तो असेल काळ ?
जागता असेल ? झोपला असेल ?
झालेली दिव्याची वेळ
अशात एखाद्या करंद जाळीला असेल लपला ? सखू

साधील टिपण ? ओढील हरीण ?
काय ग होईल सई ?
नाव ही लागली काठाला आता
काळीज उडते बाई
माघारी जाऊ, की पुढती पाहू मी ? थर्कांप उडाला सखू

२९.१०.१९८८

## निष्पर्ण

घराच्या सज्जात उभी राहून जरा मान उंचावून पाहिले,
तेव्हा टेकडीवरचे ते निष्पर्ण झाड डोळे भरून हसत राहिले.

एकदा भोवतीच्या लालस हिरव्या पानगर्दीतून
हे एकटेच अगदी धीटपणे जेव्हा पूर्ण नग्न उभे राहिले,
तेव्हा त्याच्या काळजावर भुरभुरणाऱ्या,
लख्ख पिवळ्या वासनेसारख्या एकुलत्या एका फुलझुबक्यावर,
मी नव्हते का आपले मन वाहून आले ?

७.४.१९८९

## शब्दाचा आडोसा

झोडपत्या वादळाने वस्त्रे ओढून काढली
वीजकणांची रक्तात लाही फुटून राहिली

आल्या सपसप धारा, आत उठू आला जाळ
पाण्या आगीची शपथ आणि जन्माचा कल्लोळ

अरे करुणेच्या कांता, काय केलीस कहाणी
माझा जळाला एकांत, झाले सारे पाणी पाणी

तरी उरे एक लाज, रंगनायका प्रियाळा
आता कशी भेटू तरी देह-उघड्याने तुला ?

नको पाहूस खट्याळा, तुझ्या दृष्टीआड होते
एक शब्दाचा आडोसा आणि पाऊस नेसते

१२.४.१९८९

## लाही

साय यावी स्तब्धतेला तसे शांत पाणी
ओलसर मऊ दाट तरंगती हवा
सुस्त सारे किनाऱ्याचे चळवळे जीव
चित्रावली झाडेमाडे, चित्रावल्या नावा

गडद झोपेत चार खडकाची बाळे
ऊनपाखरांच्या अंगी भरला आळस
भोळ्या गुंगीमधे जरा लोळत वाटोळा
शिंपल्यात मोतीबुंद हासतो हळूच

अशी कले दुपारही भरल्या अंगाने
सावळ्या नि मोकळ्याशा सांजेच्या खांद्याशी
बोल नाही, हालचाल नाही काही फक्त
गरम वाळूत लाही फुटते मनाची

१८.५.१९८९

## मुकी आठवण

वारा पिकून पिवळा
सांज झाली चोळामोळा
पक्षी पंख पसरून गेला आभाळ झाकून

पान अळवाचे ओले
हिरा पाणियाचा हाले
हसे जास्वंद आतून, लाल फूल टपोरून

निळे सावलीचे पाय
कोण कुणापाठी जाय
देठी मधाने भरून आला कोळाभोळा क्षण

रेंगाळत पापणीशी
ऊन ऊन कासाविशी
येई मुकी आठवण, गेले तुझ्यापास मन

१२.९.१९८९

## आसक्तीचे आभाळ

झुलवत ठेवलेय् आपण
आसक्तीचे एक मोठे आभाळ शब्दांवर
इथून तिथवर... अपरंपार.

जमीन इतकी निरागस वहरते आहे,
की देहाच्या सगळ्या इच्छा जडताहेत मनाला
चमकदार मृदू उन्हासारख्या,
उतरत्या उजेडासकट घराला वेढणाऱ्या
सायंकालीन रंगाच्या आपलेपणासारख्या.

आपण स्पर्शत नाही एकमेकांना
नाही भेटींचे वळसेवेढे घेत मिळताना.
सहज झुळझुळतो गवतपात्यावरचा पिवळसर वारा
आपल्या नात्यामधून आरपार,
आणि आपण झुलवत ठेवतो आपल्यामधून
आसक्तीचा एक नितळ उच्चार,
साधा, ओलसर, अपरंपार.

२१.१०.१९९०

## अनवाणी दुःख

बाहेर उन्हाचा जाळ,
सखि, ये ना आत जराशी
ये उतर असे, हे भार तुझे, भिंतीला टेक जराशी

मृगजळास आली भरती
लाटांवर लाटा फुटती
एकटी अशी, जाशील कशी, नाहीच कुणी सांगाती

आयुष्य रोजचे बाई
कधिमधीच सोसत नाही
गे मन दुखते, अन् अवघडते, फिरतात दिशाही दाही

कुणि हवेच जिवलग जवळी
या अशा तापल्या वेळी
हो शांत जरा, मग जाय घरा, हृदयात सर्व सांभाळी

हे दुःख तुझे अनवाणी
जाशील पुन्हा उचलोनी
पाऊलखुणा, देतील मला, ग तुझी सांडली गाणी

२७.१.१९८८

## दिवे लावताना आत

केशराची जरीकाडी झिळमिळ ढगावर
निळ्या अंधारमिठीत मिट्ट येई दिगंतर

पांगलेल्या पाखरांचे थवे जाती परतून
वारा बांबूत वाजतो कसा थांबून थांबून

आता गळ्यात पडता हात जुईच्या वासाचे
आठवावे काहीबाही थोडे मागचे मागचे

मन उगाच दुखावे, जरा डोळां यावे पाणी
गुणगुणत बसावे अर्धी राहिलेली गाणी

दिवे लावताना आत, घर उजळून जावे
अशा वेळेला कातर तुझ्याजवळ बसावे

काळ्या आभाळात तेव्हा थोडे चांदणे दिसावे
तुझ्यासाठी ओठांवर थोडे हसणे असावे

२९.६.१९८७

## पैंजण

तिचा सांडला पैंजण, कुठे गुंतला कळेना
कसा रानी वनी मनी त्याचा नाद सापडेना

तिने मागितल्या दिशा, तेव्हा साजणाने काल
किती हँसेने पायांत होते बांधले ते चाळ

तेव्हा जरीच्या साडीचे मोर उतरून खाली
तिच्यासाठीच नाचले, भुई लालीलाल झाली

रंगपदराचे रावे कसे झेपेत उडाले
दीर्घ मोकळे आभाळ त्यांच्या पंखांतून आले

तिचे नवे नवे पाय नवा छंद माळलेले
आत्ता आत्ता कुठे सारे जग जिंकाया निघाले

आणि हरवला कसा असा नक्षीचा पैंजण
कशी रानवाऱ्यालाही नाही चाहूल अजून

तिला ताल हवा तिचा, द्या ना शोधून जरासा
तिच्यासाठीच थांबला चंद्र गाण्यात केव्हाचा.

१.१२.१९८७

## मीही जगू पाहते

पुष्कळ दिल्या-घेतल्याचे
आपल्याला वाटते उगाच,
प्रत्यक्षात माणसे तशीच रिकामी
आणि आपले मन बिनफुटीचे.

नांगरटीचे बळ येईतो
सरकून जातात उमेदीचे दिवस,
आणि थर आणखी कडक होतात
जगरहाटीचे.

पावसाइतकाच बेभरवशाचा असतो
आपला धीर,
आणि कितीही खणत राहिले तरीही
स्वत:विषयीचा ओला पाझरता विश्वास
आपल्या विहिरीला लागतच नाही.

पण तू हे सारे समजून घेतोस,
बघतोस न फुटलेल्या बियांमधले अज्ञात संभव,
एवढ्यानेही माती पुष्कळ दमट राहते.
मीही जगू पाहते.

६.७.१९९०

## काळ्या नदीच्या काठाशी

असे सांजवेळी काळ्या नदीच्या काठाशी
गाऊ नये गोड बाई आपुल्या मनाशी

हवा नाही भोळी आणि नाही भोळे पाणी
तुला नकळत तुझी ओढतील गाणी

पानांतून वारा कुजबुजे काहीबाही
हळुहळू वाळू पायी सरकत जाई

आणि तूही अशी कशी मोकळ्या गळ्याने
जुळवून मन सारे ओवशी गाण्याने ?

तुझ्या जरीपदराला जाईल ग चीर
रानी पाखरांचा मोठा बोभाट होईल

'अपाप तू, तुझ्या भाळी गोंदतील पाप
कोण राखणार तुला ? नवरा न बाप.

सीतेला का दु:ख दिले फक्त रावणाने ?
त्याहूनही मोठी आग दिली राघवाने

बायो, तिला धरित्रीचा ठाव तरी होता
काय सांगू तुला, सातां जन्मांची ही कथा !

गाऊ नये सई असे आपुल्या मनाशी
चार सोडावेत दिवे नदीच्या तळाशी

२३.८.१९८७

## मेंढपाळाचे गाणे

तसे ऐकलेही असेल तुम्ही
हिवाळ्यातल्या एखाद्या दुपारी
झऱ्याच्या काठाने हिंडताना मेंढपाळाचे एखादे गाणे

किंवा एखाद्या खळ्यावरच्या रात्री
उबेपुरतेही पांघरूण नसताना
एखाद्या शेतकऱ्याने सांगितलेली गोष्ट
ऐकलीही असेल तुम्ही.

मी उभी राहते माझ्या घराच्या देखण्या सज्जात!
भोवती निवांत झाडांची मृदू सळसळ
अन् मधूनच झुलणाऱ्या ऐन हिवाळी उन्हाची
एखादीच कोवळीगार डहाळी...

मी आठवते विजनातला झरा,
काठावरची झाडे, छायांमधून भटकणारी कोकरे
आणि मी म्हणू बघते मेंढपाळाचे गाणे,
पण तसे गाणे माझ्या प्राणांना स्फुरत नाही.
जुळवले शब्द, तरी त्यांना नसतो मेंढीच्या अंगाचा वास
आणि नसते उनाड भटक्या लयीची निरभ्र साथ.

सहज दुःखासारख्या आयुष्याच्या समजूतदार स्वीकाराची
तीव्र धार नसते त्याला,
डोळ्यांत पाणी आणणाऱ्या आनंदाचे पाझर नसतात
आणि नसते, चिवटपणे भुईला धरून तगणाऱ्या झाडोऱ्यासारखी
ओले जगण्याची उपजत कला.

मग मी गाणे म्हणण्याचा नाद निमूट सोडून देते
तेव्हा खळ्यावरच्या शेतकऱ्याची एखादी म्हातारी गोष्ट
माझ्या पाठीवर आपला कापरा हात फिरवते,
कानशिलांवर बोटे मोडत मला ' औक्षवंत हो ' म्हणते,
' शहाणी हो ' म्हणते.

२९.९.१९८८

# एका चंद्रभासासाठी

माझ्या मातीला केव्हाची निळी अदृष्ट तहान
एका चंद्रभासासाठी उभे आयुष्य गहाण

तसे रक्तमांसातून किती शब्द उगवले
त्यांचे तान्हेपण सुद्धा माझे रूप-गुण ल्याले

त्यांचे जावळ हुंगले, जिणे गेले नाही व्यर्थ
वाटे आईपणासह बाईपणाही कृतार्थ

तशी नव्हते कृतार्थ, आता आताशा कळते
जेव्हा काळजाच्या तळी निळी तहान रडते

अशी एकदाच फक्त गाणी उराशी धरून
हाक अज्ञात भासांना देते प्राणांच्या आडून

आणि सांगते स्वतःला, बाई असेच असते
पोर वाढावे म्हणून नाळ तोडावी लागते

आता व्हायचीच तुझी गाणी तुझ्यातून दूर
त्यांना वाढता वाढता मिळो गगनब्रह्‌र

त्यांनी स्वतंत्र वाढावे, तुझ्यापार मोठे व्हावे
तुला ओलांडून त्यांनी नवे असीम झेलावे

तुझा चंद्रभास व्हावा त्यांच्या भाळावर टिळा
तरी बाईपणासाठी त्यांचा भरू यावा गळा

२.८.१९८७

## मोठे होत जातात शब्द

मोठे होत जातात शब्द आपल्याही नकळत.
मुलगी वयात आल्याचे
एखाद्या असावध क्षणी जसे जाणवते लकूकून्
किंवा मुलगा वयात आल्याची जाणीव
जशी उतरते गळ्याखाली संथ निर्णायक धारेने
तशी लकलक आणि निर्णायक धार—
दोहोंचा अनुभव देतात,
शब्द मोठे होतात.

माझे बाईपण, माझे आईपण—
काही, काही नाही येत उपयोगाला,
थरथर थांबत नाही देहाची,
की कोरड आवरत नाही घशाची,
अन् एकही पूर्वानुभव नसतो सोबतीला.

मधे फक्त एक अवाढव्य क्षण,
आणि पलीकडे शब्दांच्या वाढण्याची
एक चकित आणि अमिट ओळख !
शब्द मोठे मोठेच होत जातात,
आपल्या कळत...नकळत...कळत.

१९८७

## तरिहि

एकांती चिंतनात जे म्हणते अनुरागे
जगताना तुजसंगे
कशि विसरुन जाते रे ? विसरुन का जाते ?

हा स्वभाव थेट तुझा, हा असाच
परिचित मज

सारे जरि कळते रे, सहज मला कळते,
तरिहि तुझ्या एखाद्या शब्दाने, स्पर्शाने
एखाद्या करण्याने
जिवापास दुखते रे, फार फार दुखते.

२.११.१९८७

## ऊन संथ चढत जाते

ऊन संथ चढत जाते.
पिवळ्याजर्द वाऱ्यावर तरंगत येतात
मागचे झगझगीत दिवस,
मला सहन होत नाही सुखाची तिरीप,
डोळ्यांत पाणी जमून येते.

नव्याने रंगीत झालेले जुने किती तरी प्रसंग
स्मरणापाशी लवलवू लागतात,
तेव्हा मी सगळे दुखरेपण विसरते,
प्रेमाने काठोकाठ भरून येते.

चढत जाणाऱ्या उन्हाबरोबर हात पसरते आयुष्य,
मला गाणे म्हणावेसे वाटते.
आठवते तुझी हलकी हाक जिवापाशी आलेली,
तिच्यावरही ऊन चमकत राहते,
अन् संथ चढत जाते.

७.११.१९९०

## वाऱ्याच्या झोंबीने

वाऱ्याच्या झोंबीने नभ घुसळुन गेलेले
घन निळसर दु:खाचे स्मरणावर आलेले

जर्द एक वीजसळी, क्षण दुभंग झालेले
अन् उदास सांजेचे हृदय रक्त-भिजलेले

आठवते हाक तुझी, पागोळी मंद गळे
किति हलक्या श्वासांवर जग अवघे मिटलेले

थेंब थेंब टपटपता मन भिजून गेलेले
शब्दाचे एक पिलू वळचणीस आलेले

२१.५.१९९०

## कोरा कागद

समजा की इथे आहे गावाची वेस,
तिथून पुढे एक वेडीवाकडी वाट धूळभरली,
एक वळण घेऊन पुढे दिसेनाशी झालेली.
तिचे पुढे काय होते माहीत नाही.

समजा वेशीपर्यंत आहेत गावातली घरे
दिसताहेत त्यांची जुनाट लहानखुरी दारे.
उखीरवाखीर अंगणामधे लहान मूल रडते आहे,
आणि एक निर्बुद्ध कुत्रे म्हशींमागून हिंडते आहे.
नंतर ते काय करणार, सांगता येत नाही.

समजा कुणी एक उभा आहे गावाकडे पहात
वेशीवर उभा, किंचित् वाकला आहे,
पण त्याच्या पाठीवर कसलेही ओझे नाही.
चेहरा आहे थकलेला, कारण असावे काही,
आपल्याला ते समजत नाही.

समजत नाही त्याला नेमके काय करायचे आहे,
गावात यायचे आहे, की गावाचा निरोप घेऊन जायचे आहे.
अद्याप बांधलेले आहे का त्याचे आतडे
वेशीच्या आतल्या आयुष्याशी,
की त्या बेभरवशाच्या वाटेने घातली आहे फुंकर त्याच्या पायांवरती ?

की तो नवखाच आहे आलेला
दु:खाच्या तळपेतून चालत भर माध्यान्ही,
आणि त्या गावाच्या परिघात
भेटेल वाटते त्याला आपले असे कुणी ?

समजा की—
पण तसे काहीच खरे तर आपल्याला समजायचे नाही.
जसा आहे तसा कोराच हा कागद,
त्यावर रेषा नाही की चिन्ह नाही.

१५.८.१९९०

## चित्र

आपण दोघं आहोत एकत्र,
असं चित्र काढणं अवघड आहे,
हे मी तुला कितीदा तरी सांगितलं आहे.
तरी हट्टानं काढणार असशील तर काढ बापडा,
तो पॅलटवरचा रंग घे पांढरा,
मिसळ कशात तरी, कर करडा.

आता काढ मैलोगणती पसरलेला
एक वाळूचा पट्टा वेडावाकडा.

कशाला लाल न् गुलाबी ?
पिवळा न् करडाच होईल पुरता,
निवडुंगाला फुलंबिलं येण्याचा तो ऋतूच नव्हता.

तापलेली पिवळट कोरडी हवा,
निर्मनुष्य सगळं, च्, नव्हता रे कारवाबिरवा.
आभाळ ?—ते असणारच की !
काढ तुला हवं तर, पक्षीबिक्षीही.
पण नकोच. नसल्यानं काही बिघडत नाही.

आता आपण काढ ना, उभे असलेले मधेच कुठे तरी
ओठांत ओठ गुंतवून.
आठवनंय् ना ते शोषून घेणं एकमेकांना
सगळी ताकद एकवटून !
मोठे नको इतके,
जीवघेण्या तहानेने आपण ठिपक्याएवढे लहान झालोय्
एकमेकांना सावकाश शोषत, संपवत गेलोय्.
आणखी काय सांगू मी ?..

१८.३.१९८९

## मरणाऱ्या संबंधाची गोष्ट

प्रथम नुसताच कोंब
आत-बाहेर कोवळाचिंब
रुजून येण्याच्या सुखाने अगदी तुडुंब तुडुंब.

मग लवलव पान
आत-बाहेर हिरवे रान
सरसरून वाढणारे हवेपण, उमेदीला उधाण.

मग एक किडा लहानसा
तीक्ष्ण, दातेरी भुकेचा
सावकाश कुसरीचे काम, संपणारे पान पान.

जमिनीजवळ ना कसली खूण
ना उदासी, ना तहान
एका मरणाऱ्या संबंधाची गोष्ट–म्हटली तर मोठी, म्हटली तर लहान.

२१.१०.१९९०

## मनाच्या तावदानावरून

भुरुभुरु गळत राहतो एकटेपणा
मनाच्या तावदानावरून संथपणे...

हळुहळू उलगडत जातात आतले कोष,
दुखऱ्या जखमा वाहू लागतात, निचरा होतो.
किती हलके होतात श्वास पुन्हा,
सुट्ट चाललेला धीर पुन्हा गोळा होतो.

मला आठवतात पुष्कळ जुने दिवस.
वाटते, परकरी पोर असताना
आयुष्य जसे हवे वाटले होते तीव्र ओढीने,
तसे सगळे जिवापासचे जुळवून
सुरू करता येईल जगणे नव्या धारेने.

स्वत:ची स्वत:शी भेट
नसते एवढी तुडुंब नेहमीच.
म्हणून मी काठोकाठ भरून जाते
सुख म्हणता येईल अशा निळ्या दु:खाने.
भुरुभुरु गळत राहतो एकटेपणा
मनाच्या तावदानावरून संथपणे...

९.७.१९९०

## खूळ

एखादा उन्हाचा कवडसा नाचत रहावा पाण्यावर
तसे तिला आठवते सगळे पावलांखालून निसटलेले.
बिट्ट्यांसारख्या ठक्क वाजवत झेलता येतात जुन्या गोष्टी,
जरा नाक फुलवले तर वास येतात भूतकाळातले कुठले कुठले.

हटकून आठवतो तिला तो झळझळता हिरवा आंबा,
आणि त्यावरचे ते फुगीर पाखरू छाती भरून गाणारे.
उतट पानांमधून येणारे उकळत्या रक्तासारखे गाणे,
आठवते वेगाने काळजात उतरणारे.

खुळावल्यासारखी गात सुटलेली ती तरुण वर्षे,
ते दिवस दुधामधाच्या धारेने दूर वर वहात गेलेले...
पुन्हा मागे न फिरलेले ते लसलसते आयुष्य,
आणि आता अस्तित्वाचे सगळे संदर्भच संपून गेलेले.

मनासारखीच ओल आटत गेलेली शेते पाहते ती,
गुणगुणते आपणच रचलेली जुनी गाणी.
विसरू पाहते त्यांच्यावरचा आपल्या जिवाचा ठसा,
आणि कधी कधी घट्ट मिटून घेते ओठ न् पुटपुटते
की या मोकळ्या भुईवर कुठे तरी दृष्टीआड
पण असेलच एखादे झळझळीत हिरवे आंब्याचे झाड,
की वसतच असेल दाट पानात
एखादा फुगीर पंखाचा रावा गात,
की ऐकेलच त्याचा शब्द कुणी तरी एखादी पोर,
मग माझे खूळ तिला लागो ! तिला लागो जन्मभर !

४.४.१९८९

## केशराची खूण

परतले सांजऊन धूळवाटेने जपून
मनापाशी राहिलेली एक केशराची खूण

दाट निळा निळा भास, त्याचे वाऱ्यावर सडे
काळोखाच्या घडीवर रंग जरासाच उडे

अंगणात कसनुशी उललेली जुई फुले
चुणी वासाची सारून कोण उंबऱ्याशी आले

माझ्या हातात टपोरी वेळ कातर कातर
कुणी पुढ्यात झुकून वर ठेवला अधर

जरा हालला उजेड, डोळे झिळमिळ झाले
दिवेलागणीला कोण जीव लावूनिया गेले

कसे आले, कसे गेले, काय लावियले भाळी
मनकेशराची खूण कशी झळाळून आली

पाचूकाकणे जवळ, कोणा माहीतही नाही
हाती घालू, नको घालू, काय करू सईबाई ?

२०.९.१९८९

## भवतीच्या कोलाहलातून

मागच्या करड्या दिवसांवर रेंगाळणारे
सगळे गुंते सोडवीत नेटाने;
मिळवीन म्हणते मी एखादा ताजा श्वास नवेपणी,
कुंद ओल्या जगण्यामधून वाट काढत
चालेन म्हणते मी जीव लावून दूरपर्यंत अनवाणी.

जाईन म्हणते मी तेवत्या दिव्यासारख्या
सतेज करुणेच्या गाभाऱ्यात,
भरलेल्या कळशीसारखे मन घेऊन, सांभाळून
पुढच्या प्रत्येक क्षणाचा माथा उंबऱ्याशी टेकवून
करीन म्हणते सगळ्या अस्वस्थ शब्दांचे शांतवन.

प्रेमाच्या पहिल्या उच्चाराइतके उत्कट
गाईन म्हणते मी सारे काही स्वत:मधून.
अन् देवाची फूल-सुपारी पदरात न्यावी जपून,
वारीच्या लोटत्या गर्दीमधून,
तशी नेईन म्हणते कविता भवतीच्या कोलाहलातून.

२.१.१९९०

## क वि ता श ब्दां च्या

▭ ▭

मिटवुन सुख माझे मी उभी स्तब्ध आता
अपरिमित कृपेचा रे टिळा लाव माथां
अपरिचित उदासी खोल प्राणात जागो
प्रभु, तव करुणेचा दीप शब्दांत जागो

▭ ▭

## बीज

शब्द पडून असतो खडकावर वर्षानुवर्षे
फुगत नाही की फुटत नाही उलून
खरबरीत कडक कवच वर, बीज नुसते पडून

आत एक मधुर अंधार जिवंत, चकचकीत ओला
आठवत असतो उगमाजवळच्या निळ्या गोष्टी
स्वत:मधेच नादावलेला

आठवणीत असते पिवळीधमक एक लकेर वाऱ्याची
छुन्नकगिरकी चिटुकपंखी फुलपाखरांची, मोराची
एक वादळ धुमसणारे, मुळापर्यंत घुसणारे
शरदातले एक स्तब्ध आभाळ चंद्रासकट मिळणारे
काही हिरवी कोमट वर्षे सुगंधाने भरलेली
पाणथळीतली गलबतगवते मनावरती टेकलेली

खरपूस भाजलेले टणक, तयार
आतून ओले तरतरीत, हुशार
आता जर हे टपोर बीज एखादा भटक्या पक्षी उचलेल
अन् ढुसण्या देत, मनाच्या मातीत, चिक्कण ओलीत मजेत टाकेल
तर फुगेलच ते, फुटेल रसरसून, चहू बाजूंनी वाढत जाईल
गोष्ट होईल, गाणे होईल, परीकथेत झुलत जाईल
बाप होईल, आई होईल, आभाळ होईल, भुई होईल
न पेक्षा खडकावरती वाट पहात वर्षानुवर्षे पडून राहील.

९.१२.१९८९

## झाड

आईच्या उबेतून तो दूर झाला, तेव्हापासूनचे ते वेड त्याचे
बहरातल्या घोसतुऱ्यासारख्या शब्दांभोवती
त्याचे सगळे कोवळे अनुभव नुसते घमघमत असायचे

नंतर सगळे झाडच त्याच्या ओळखीचे झाले
हिरवा रस शोषून घेत पानांमधून पसरणारी पिवळी नश्वरता
गळून पडणारे एकेक शुष्क पान, मुळीच आवाज न करता,
खोडाचा विटकरी खरबरीत स्पर्श निर्मम सत्यासारखा
अन् सालीआड दबा धरून बसलेली वाळवी, तिचा फौजफाटा...
त्याने सगळे झाडच पाहिले
तेव्हा पूर्वीचे बेभान वेड पुष्कळच कमी झाले

आणि मग एक दिवस अचानक
अर्ध्या झोपेसारख्या जागेपणी
त्याने पाहिले जमिनीखालचे खरे झाड,
त्याचा परिसर, त्याचा पसारा, उग्र झुंजीतून होणारी त्याची वाढ
ती प्रतिकार करणारी जमीन, त्याचा आग्रह तिला मुठीत ठेवण्याचा
ते भुलवून तडफडत ठेवणारे मायावी पाणी
आणि मधूनच ऐकू येणारी
पाताळातील आदिपुरुषाची विषारी गाणी

भयाने थरथरत पळत सुटला तो,
त्याने झाडाची ओळखच नाकारली,
झाड मात्र तसेच, घोसतुऱ्यांनी लहडलेले
पसरून उभे दाट सावली
नित्यनेमाने गळणारी पाने, खोडातली वाळवी, जमिनीखालची झुंज,
साऱ्यांसकट झाडाचे जगणे
त्याच्या स्वीकारण्या-नाकारण्याच्या पार पलिकडचे,
स्वतंत्र, स्वयंभू, अखंडपणे.

२९.६.१९९०

# आदिमाया

परस्परांच्या आत्म्यांचा एकांत सांभाळणे
एवढीच अट घातली तिला शब्दाने,
ती स्वत:च्याच कौतुकाने डंवरली.
हिरव्या चाफ्याच्या वासासारखा
भाषेतून वाहणारा त्याचा स्नेह
श्वासात भरून घेत घाटावर येऊन थांबली.

तिच्या पितळी कळशीची चकचक
जोडव्यांच्या ठाशीव नादावर मग लयदार झाली,
अन् भिरकत्या गुलाबी पायांच्या एका बगळीनं
पंखांवर किरणांची ओली हळद भिरवली.

मुहूर्त गोरज, देऊळ भरून घंटांचा आवाज घुमला
तेव्हा कार्तिकी संध्येच्या पाण्यात दिव्यांची ओळ उतरली.
चिमूटभर केशरी रंग मावळतीने भरला तिच्या भांगात,
ती अंतर्बाह्य सजून गेली.
उभी राहिली कातर, ओठंगून, शब्दाची वाट पहात,
कसा येईल तो ? कोणत्या प्रहरात ?

तो आला अंधार होऊन, झडप घालत,
त्याने भवताल गिळून टाकले.
कुठले पाणी ? घाट कुठला ? सगळे सगळे मिटून गेले.

ती घाबरली नाही की नाही बावरली, मन ताठ ठेवले तिने,
ओळखला सत्याचा स्पर्शही वाऱ्याला आलेला धारदारपणे.
आवाहन केले तिने स्वतःच्या स्त्रीत्वाला,
आणि ती निर्भय, ती कोवळी, म्हणाली शब्दाला,

' मी तुझीच आहे दयाळा,
पण किती अवघड आता एकांत सांभाळणे तुझ्यातला !
अन् त्याहीपेक्षा अवघड सांभाळणे माझ्यातला !

मी वाकवते आहे मस्तक
की वाहून जाऊ दे स्वप्नाची लाट माझ्यावरून.
मी जोडते आहे हात
की मला भिडता यावे अंधाराच्या सर्वसत्ताक अंगाला,
माझे अस्तित्व टिकवून, आमचा एकांत जपून.
मी करते आहे प्रार्थना, की मी व्हावे तुझी सखी खरोखरी,
या घनदाट ईश्वरी अंधारात मी आदिमाया, मी लज्जागौरी. '

३.२.१९८९

## बाग

भाषा असते बागेसारखी, तो म्हणाला.
थोडे पाणी, थोडी हिरवळ, थोडी इवल्या फुलांची मखमल.
थोडी वाळूची वाट, थोडी निवडुंगबनं,
पण त्यातसुद्धा देखणे आकार,
चित्रविचित्र फुलं नि पानं.
कुठून कुठून आणलेली नाना देशांतली रोपं,
त्यांच्या असंख्य तऱ्हा, त्यांची स्वतंत्र वाढ,
भाषा असते अगदी बागेसारखीच, त्याचा विश्वास गाढ.

अर्ध्या वयातली पोर,
तिने त्याच्या शब्दांवर जीव ओवाळून टाकला
आणि स्वप्नात चालत जावे,
तसा त्या धूसर वाटेवर पाय ठेवला

थोडी थरथर, अधीर उत्सुकता,
बागेत गिरकी घेणाऱ्या पाखरासारखे तिचे डोळे.
तिने कुरवाळले गवत, हुंगून घेतली फुले,
पानांमधले हिरवे आभाळ झुलवत नेले.

हळुहळू गळू लागला अंधार,
बागेचे रूप बदलत गेले.
ती उभी स्तब्ध, बागेच्या मध्यात,
एकाएकी तिला कळून आले
प्रत्येक बागेच्या मनात असतेच एक मोकळे भरदार, भयावह रान,
कुठे तरी दबा धरून टपून बसलेले,
बाहेर पडून जोमाने वाढण्याची वाट बघत असलेले.

२.७.१९९०

## करुणेचा चंद्र

त्याचा मुक्काम नव्हता खरे तर डाकबंगल्यावर, नव्हता देवळात,
सत्काराचे समारंभ नव्हते, की नव्हते गौरवलेख वृत्तपत्रांत.
तो नव्हता कुणी नेता, मठाधीशही नव्हता,
तो साधासुधा, आपल्याच नादात फिरता फिरता,
त्या श्रीमंत सांस्कृतिक शहरात नुकताच आला होता.

पण असह्य झाले नामवंतांना त्याचे गावात नुसते वावरणे,
सुखदु:खाच्या गोष्टी करीत सर्वांमधे असणे,
त्याची भणंग मस्ती आणि जखमेवर फुंकर घातल्यासारखे बोलणे.

त्यांच्या सुदर्शन मंदिरांकडे फिरकलाही नव्हता तो,
की दिली नव्हती भाषणे सभांमधून.
मात्र वागणे असे की, देव जणू उठला आहे निजून,
आत्ता, इथे, याच्याच तर हृदयातून !

तो येऊ लागला कित्येक प्रतिष्ठितांच्या स्वप्नात, हसू लागला.
आवरणाशिवायच्या त्याच्या उघड्या मनाचा वास
त्यांना असह्य होऊ लागला.

खटले भरले गेलेच त्याच्यावर, प्रतिष्ठितांनी सुटकेचे निःश्वास सोडले,
संस्कृतीला योगदान देण्यात मग पुन्हा शहर गढून गेले.

तो आहे म्हणून आहोत आम्ही सुखरूप,
असे मानणारे चार-दोन वेडे मात्र,
अजूनही वसतात त्याच्या पुढ्यात.
अन् तोही नग्न त्यांच्यासमोर, पाझरणारा आणि शांत.

तो खुले करतो वेड्यांचे हृदय अंधारासाठी,
त्यांच्या स्वप्नांवर कठोरपणे वार करतो,
त्यांना लावतो वेदनेचा घवघवीत टिळा आणि उदास हसतो.
तो देतो त्यांच्या जीवांना श्वासांची ऊब,
सत्याला सामोरे जाण्याचे बळ देतो
आणि अकस्मात् झळकतो जेव्हा कोवळ्या दुःखाने,
तेव्हा संस्कृतीच्या एकांतात करुणेचा चंद्र उगवतो.

१५.३.१९८९

## गारुडी

ल्हान-मोठ्या किती तरी बुट्ट्यांची उतरंड त्याच्या घरी,
तो सहज खेळवायचा शब्द, रंगेल गारुड्यासारखा.
लाल, पिवळे, हिरवे, काळे सर्प खेळत त्याच्या अंगाखांद्यावर,
त्यांच्या वळसेदार गुलामी अस्तित्वात मिरवायचा तो मस्तवाल,
एखाद्या सम्राटासारखा.

एरवी धक्के खायचा तो गर्दीत, पुष्कळदा त्याचे खिसे
सफाईनं कापले गेलेले.
सराईत खोटे बोलणाऱ्यांत त्याचे नाव पहिले,
आणि बायकोच्या घामट मिठीत सैल पडण्याचे प्रसंगही
अनेकदा आलेले.

पण बुट्टीला स्पर्श करताना मात्र तो असायचा
युद्धोत्सुक सम्राट ! मानी ! स्वतंत्र !
शब्दांच्या नुसत्या चाहुलीनं फुलायचे अंगावरचे केस,
प्राण फुगून वाजायचे पुंगी होऊन, मन ताठ व्हायचे,
रक्तातून एक उष्ण बेभानपण धावत रहायचे.

बोटांची शस्त्रे व्हायची लपलपत अंदाज घेताना,
श्वासांना टापांची लय यायची.
ताणली जायची टणक जाणीव आपोआप,
समोरच्या खवलेदार हालचालीचा दृष्टी अचूक वेध घ्यायची.

त्याचे डोलणारे शब्द, त्याचे गाजणारे प्राण...
तो कसलेला गारुडी एक दिवस अचानक मेला.
त्याने म्हणे ऐन उन्हाळ्यात, बोडक्या रानात
करंद काळ्या नागासारख्या उग्र शब्दाचा पाठलाग केला.
झुंजीचा अवकाशही दिला नाही नागाने,
थेट कडकडून विळखा घातला आणि मस्तकालाच दंश केला.

गारुडी गेला.
बुट्टयांमध्ये सुस्त पडून राहिली वेटोळी पाळीव शब्दांची
कुणा नवशिक्याची पोतडी त्यांच्यावरच आता मजेत भरायची.

१५.२.१९८९

## ताजा उष्ण आवाज

तिला हवा होता शब्द
अबलख घोड्यावर स्वार होऊन येणाऱ्या राजपुत्रासारखा,
उमदा, हवा होता धीट, तेजस्वीही.
त्याला हवेसे व्हावे म्हणून तिने जोपासले होते किती स्वतःलाही !
आळवले होते स्वतःचे सारे परोपरीने,
आणि मग ते रात्रंदिवस पुन्हा पुन्हा वाट बघणे...
वाट बघणे निरर्थक लांबच लांब आयुष्यासारख्या भाषेतून
त्या सक्षम जातिवंत शब्दाची वाट बघणे !
ते वारंवार कानोसा घेणे, अडखळणे, खिन्न होणे,
सगळी प्राणशक्ती एकवटून नुसती वाट वाट होणे...

तो आला.
मालवल्या होत्या तेव्हा सगळ्या प्रकाशित खिडक्या,
मध्यरात्र झालेली,
गावातले आणि गावकुसाबाहेरचे सगळे झोपेत दाट,
घरं काळोखमिट्ट, बंद असलेली.

तिच्या उघड्या दारातून तो आत आला शिणलेला,
तिच्या मस्तकाला स्पर्श करून समोर उभा राहिला.
तिने उघडले डोळे आणि भयचकित पहात राहिली,
ते भेगाळ रुखे शरीर, कपडे लक्तरलेले,
त्या केसांच्या जटा, म्लान पण भुकेले डोळे,
तो चोपलेला चेहरा, त्यावर अनाम मर्मस्पर्शी भाव,
कोण हा माझा ? काय माझ्या प्रेमाचे नाव ?

ती स्तब्ध राहिली क्षणभर, मग उसळून उठली,
त्याच्या गळ्याला प्राणांतिक मिठी घालून रडत राहिली.
तो शांत, त्याच्या दृढ मिठीत थरथरत राहिली ती,
तिचा ओला चेहरा वर उचलत तो हसला.
अन् रक्ताच्या चिळकांडीसारखा एक ताजा उष्ण आवाज
तिच्या हृदयातून मग उंचच उंच उठला.

३.२.१९८९

## शिकार

शिकारी कुत्र्यासारखा तीक्ष्णपणे तो काढतो शब्दांचा माग
भासासारख्या रानातून, ध्यासासारख्या पाण्यातून
प्राणघातक नात्यातून पायफसत्या गुंत्यातून
बहाद्दर तो नेमका घुसतो,
मस्तकात धरतो एक लहानसा अर्थपूर्ण वास
आणि ओळख हुंगत हुंगत थेट लक्ष्यापर्यंत पोचतो.
त्याचे काम एवढेच. मग मालक पुढे होतो.

मालक शिकारी मोठाच लहरी.
मनात असेल तर हासडतो एक अवाच्य शिवी
आणि सणसणून बार टाकतो.
न पेक्षा नुसताच हसत बघतो
एखाद्याचे जिवावर उदार होऊन निसटणे
किंवा जगण्याच्या धगीने लाल झालेल्या
एखाद्या जनावराच्या उद्दाम लढ्याच्या तयारीला
अगदी मनमुराद दाद देतो.
कधी खिळून राहतो एखाद्या मृगनयनी करुणेसमोर
कधी एखाद्या उमद्या मरणाशी गुडघे टेकतो,
कोसळल्या धुडाजवळ मग फिरकूही देत नाही कुत्र्याला
दूर हाकलून लावतो.

मालक लहरी. कुत्रा इमानी. सावज नाना तऱ्हांचे.
हा खेळ तर वर्षानुवर्षं चालतो
एखाद्या वेळी बेसावधपणे पाहिलाच कुणी तो,
तर त्याचाही होतो एक शिकारी कुत्रा.
अन् तो तीक्ष्णपणे नव्या सावजाच्या मागावर निघतो.

१६.५.१९८९

## यातुधान

उघड्या माळरानात एका वठलेल्या झाडाशी
पाशवी शांततेत पडली त्यांची पावले, धीमी, हिंसक, ऐन मध्यरात्री.
अंधाराचा बुरखा तोंडावर, बाकी सारे उघडे एका शरमेवाचून.
भोवती हाडे फोडणारा गारठा जणू पसरणारा
त्यांनीच रेखलेल्या वर्तुळातून.

विचित्र ताठर आवाजात आता ती माणसे घुमू लागली.
वाकली सारी वर्तुळातल्या प्रेतवत् काळ्या शब्दावर,
आणि शतकांपलीकडच्या यातुधानाची विषारी वाफ
आसमंतात दाट भरू लागली.

विनाशाच्या प्रारंभक्षणाची प्रतीक्षा त्यांच्या डोळ्यांत,
उत्तेजित हृदये, आवाज अधिर, उत्कंठित.
हळुहळू हलू लागले प्रेत, फिरू लागले स्वत:भोवती हेलकावत
भोवतीची माणसे ताणलेली आणि नजरा विस्फारित.

श्वापद गुरगुरावे तसे काळ्या शब्दाने विचारले काम,
आणि त्यांनी दाखवले बोट वस्तीच्या दिशेने.
खिदळल्यासारखी उसळत सरकली विषारी वाफ,
गावावर पसरली अगदी संथपणे.

आता तो काळा विनाश जाईल माणसांच्या वस्तीत,
खाईल मांस, मोडील हाडे, सांडील रक्त.
मिटवील एकेक जिवंत मन, मुरगळील गाण्यांच्या माना,
पुस्तकांवर त्याच्या केसाळ पंजाचा ठसा उरेल फक्त.

तो करील संस्कृतीचा चिखल, नाचेल श्रद्धांच्या छातीवर,
तो चिरडील कोवळ्या मुलांची स्वप्ने, शहाण्या मेंदूंचा तोल ढळवील,
आणि विकृत नाकर्तेपणाची कीड उठवील तरुणांच्या भविष्यावर.

तो बाहुला मृत इच्छांचा, तो मूर्ख सनातन,
तो शक्तिमान, सर्वनाशक, तो आंधळा, अकरुण !

माळावरचा जथा पाहील त्याच्या लीला आनंदात,
ऐकेल सभ्यतेचा आकांत, थंड आसुरी समाधानात,
विसरून अगदी पूर्णपणे, की देवळात जाग्या असतील प्रार्थना,
आणि एका निर्णायक क्षणी,
त्या रोखतील त्याला, त्याच्या सर्वभक्षक प्रेरणांना !

मग तो येईल परत माळावर, येईलच पुन्हा त्यांच्यात,
आणि वसूल करील आपली किंमत तेवढ्याच सैतानी आवेशात.

१.३.१९८९

## निर्मनुष्य नवीन वाटेवर

एका धगधगीत दुपारी मी शब्दाला पाहिले
नेहमीच्या माळावरून पलीकडे डोंगरात सरकणाऱ्या
निर्मनुष्य नवीन वाटेवर, उचलताना अनवाणी पावले
आणि त्याच्यामागे मी धावत सुटले.

रक्त लागून त्याच्या पावलांचे, लाल गुलावी झालेले
केवढे तरी सुंदर दगड मी वेचले
आणि बाभळीच्या काट्यांवर अडकलेले त्याच्या अर्थाचे असंख्य तुकडे
दूरपर्यंत दो बाजूंना फरफरत राहिले.

... ...

–ती गलिच्छ कुजबुज ऐकून थबकले तेव्हा दिसले
साड्या नेसून मुरडणाऱ्या चारचौघांचे टोळके
भाषेच्या त्या आडवळणावर उभे आरामात,
बहुधा त्याचीच वाट पहात.

मी पाहिले त्यांना अचकट विचकट विक्षेप करीत
थोडे उद्दाम, थोडे अश्लील हसताना,
पाहिले त्याच्या अंगचटीला जाताना.
तो अन्यमनस्क त्यांच्याकडे पहात असूनही पहात नसलेला
किती सहज संथपणे पुढे चालता झाला.

मागून लांबले टोळक्याचे घाणेरडे हसणे
माझा संताप संताप होणे
आणि भान विसरून तिरीमिरीने त्यांच्यासमोर येणे.

पण पाहिलेही नाही त्यांनी माझ्याकडे
ते धावत त्याच्याच पाठी निघून गेले.
मला नव्हते त्यांनी आपले लक्ष्य बनवले.
त्यांना हवा होता शब्दच विकृत एकाग्रपणे.
त्यांना छेडायचे होते त्यालाच
त्याचाच तोल ढळवून त्याला भोगायचे होते

मी व्याकुळ थबकले तिथेच, नाही पुढे गेले,
कोण जाणे पुढच्या वळणावरती त्याच्यावर
त्यांनी झडप घातलीही असेल अनावर.
पण मी मात्र डोळे मिटून म्हणत राहिले,
'मूर्खांनो त्याने जर पाहिलेच तुमच्याकडे जाणतेपणे
तर जाल हतबल होऊन वरमून
त्याच्यातल्या अविकृत ठिणगीने जाल भस्म होऊन
आणि तो जाईल एकटाच पुढे अविचल गतीने
डोंगराकडे सरकणाऱ्या त्याच्या नवीन गूढ वाटेवरून.'

३.१.११९८९

## नामानिराळा

बलात्काराला सज्ज झालेल्या पुरुषासारखा
शब्द उभा तिच्यासमोर एका एकट्या संध्याकाळी अचानक.
त्याने रोखलेल्या सगळ्या वाटा तिच्या मनाच्या,
ती हलू नाही शकत, नाही किंचाळू शकत,
फक्त बघत राहते त्याच्या डोळ्यांतली हिंस्र चमक.

तिचे सर्वस्व असते त्या वेळी फक्त एक भरलेले मन,
थडथडून उडणाऱ्या धमन्या आणि भीती छाती फोडणारी,
एक उग्र नकार कोंडलेला घशात,
वस्त्रांसारखी जाणीव गळून गेलेली,
अन् त्वचा त्याच्या दृष्टीला आरपार वाट देणारी.

आता तो येईल पुढे तसूतसूने, वखवखून झडप घालील,
करील पार चोळामोळा,
किंवा साप खेळवतो बेडकाला तसा सावकाश खेळवील.
लुकलुकती जीवनेच्छा डोळ्यांत ठेवून
ती धडपडेल आधी,
मग तिला शरण जावेच लागेल.

अशा जबरी संभोगातून पुढे
जन्माला येईल कदाचित् एखादी अपुऱ्या दिवसांची विकृत कविता,
आणि तिचे सगळे आयुष्यच
त्या सर्जनामागे फरफटत जाईल.
शब्द मात्र राहील नामानिराळा, सगळ्या विधिनिषेधांपलीकडे.
एखाद्या एकट्या संध्याकाळी, नव्या उत्कंठेच्या दारात
सगळ्या वाटा रोखून सावधपणे,
दत्त म्हणून उभा राहील.

२०.३.१९८९

## देवळाच्या गाभाऱ्यात

राजरस्ता सोडून प्रवाशाने जंगलाची वाट धरली
तेव्हा पुढ्यात वाढलेल्या संकटांची त्याला नेमकी कल्पना नव्हती.
पण होती त्याच्याकडे तशी एक कुऱ्हाड, एक लाठी,
झालाच श्वापदाचा हल्ला, तर बचावाची संधी होती.

तो चालला सावधपणे वाट काढत,
आणि अनपेक्षितपणे ते झाले,
झाडोऱ्यात दबा धरून बसलेले काळेशार एकाकीपण
झेप घेऊन त्याच्या अंगावर आले.

मागे-पुढे, वर-खाली, त्याला वेटाळत गेला तो अवाढव्य विस्तार.
तो भयचकित, हतबल, निराधार.
गुदमरून कोसळताना कळले त्याला,
आपण समजतो तितके सोपे नाही लपवणे स्वतःमध्येच स्वतःला.

केव्हा तरी तो शुद्धीवर आला, त्याला जाणवले, की
भेदरलेल्या मनाला कुणी थोपटते आहे,
काढते आहे पायांतले काटे, रक्त पुसते आहे.
करते आहे आडवाटेने चालण्याच्या हिमतीचे कौतुक,
न समजणाऱ्या ध्वनिसंकेतांत समजणारा स्नेह भरते आहे.

जिवाच्या आक्रांताने दुःख फोडून पलीकडे जावे
तर कधी कधी असे सुख भेटते,
की त्याच्या एवढ्याशा मऊ स्पर्शाने सुद्धा
घळघळून रडू फुटते.
तो नव्हता धार्मिक, पण त्याने हात जोडले.
पिवळ्या रानफुलासारखा एक शब्द ठेवला पायांपाशी,
अगदी कासावीस होऊन,
आणि पुन्हा पाऊल उचलले.

या घटनेला आता कितीक दिवस लोटले.
रानफूल जिथे होते तिथे स्मृतिस्थळ झाले.
डौलात उभे राहिले देखणे देऊळ, त्याला सोन्याची फुले जडली,
दंतकथा, पुराणे रचली गेली,
एक विशाल जत्रा सालोसाल भरत चालली.

जंगल हटले मागे, नवे तीर्थक्षेत्र बनले.
कभिन्न काळे एकाकीपण मात्र
देवळाच्याच गाभाऱ्यात मग दबा धरून बसले.

१७.३.१९८९

## निर्णयाचा क्षण

शब्दाने हसून लववली मान, तिला स्वीकारले
आणि तिला वाटले,
भूगोलावर टेकवून एका पावलाची बोटे
एखाद्या बॅले नर्तकीसारखी ती उंचावेल दुसरा पाय
निळ्या संध्येच्या पारदर्शीपणात अगदी कमनीयतेने,
आणि फेकील आपले सुडौल हात दो बाजूंना
नजर विस्तारत दिशांमधून सहजपणे,
तेव्हा शब्द असेल उभा तिच्या नाजुक कमरेवर हात लपेटून,
तिच्याकडे पहात लयीत झुलेल तिच्या भोवताळून,
आणि जग करील टाळ्यांचा कडकडाट विस्मित होऊन.

तिने घेतली गिरकी आपल्या या कल्पनेभोवती
आणि ती शब्दाला बिलगली,
तो निघाला लांबच लांब ढांगा टाकत दूर कुठे,
तेव्हा हातात हात देऊन मजेत चालत राहिली.

तिला वाटले, तो थांबेल ते शहर असेल
आपल्या किशोरवयासारखे उत्कट आणि गोड !
असेल ताज्या कैरीचा वास हवेला
असतील माणसांचे विचार स्वच्छ मोकळे,
आणि असेल एका सहज थरथरीवर आयुष्य झोकून देण्याचे वेड !

पण तो थांबला नाही असल्या शहरांच्या वेशीवर,
आणि थांबला नाही ऊबदार गावांच्या हृदयातही.
म्हणाला नाही, ' थांबू इथल्या स्वागतोत्सुक डोळ्यांत
आणि करू एखादे नृत्य आपण दोघेही. '
विश्रब्ध तंद्रीत तो आला विजनाच्या वाटेने.
ती फरफटत मागून भयव्याकुळ डोळ्यांनी
भोवती काटेसावरीसारखी दाटलेली गर्विष्ठ वने.

ते रस्ते संस्कृतीच्या ओसाडीतले...
शेवाळलेल्या विचारांच्या पडक्या विहिरी.
आणि फणेरी आग्रह भरपूर माजलेले...
विकलांग बंडांचे कुठे उदासवाणे कण्हणे
कुठे बिलंदर तत्त्वांचे जाळीमधून खसफसणे...

गुदमरून टाकणारे ते भयाण अज्ञात तिला सहावेना.
ऐकवेना पडझडीत चेंगरलेल्या मूल्यांचा आकांत
तरीही शब्दाचे संथ पुढे जाणे बघवेना.
तिला सोडवेना त्याचा हात, त्याच्याबरोबरही जाववेना.

मग थांबला तो अचानक, तिची तडफड कळल्यासारखा
सारे जगच जणू गर्रकन् वळून थांबले.
हाच निर्णयाचा क्षण, हाच ! तिला आपसूक उमगले.
तिने टेकले गुडघे, झुकवले मस्तक, त्याने तीन वार केले,
भाषेत जे साकळले ते तिचे रक्त की त्याचे अश्रू,
हे मात्र अजून नाही कळले.

२१.२.१९८९

## अज्ञात

तो निघाला तेव्हा पावलांना मिठी मारून रडली प्रिया,
आईने दाराआडच हुंदका दावला.
पाळण्यातल्या तान्ह्याकडे नजर टाकून
वडिलांनी दीर्घ निःश्वास सोडला.

त्याने पाहिले आपल्या प्रवासाचे भविष्य प्रियजनांच्या डोळ्यांत
दऱ्यांमधे कोसळणारा अंधार, दुर्गम सुळक्यांचे पर्वत,
फुसांडत वाहणाऱ्या नद्या, काठावरचे सगळे पोटात घेत,
क्रूर अरण्यांमध्ये घोंघावणारा मृत्यू, कठोर, अपरिचित,
आणि एवढे पार करून गेले जरी सहीसलामत,
तरी नंतर तहानेएवढा अथांग समुद्र ओलांडायचा कसा एका झेपेत ?

त्याने पाहिले हे सारे, ऐकलेही पुन्हा त्यांच्या रडण्यातून
एकवार वाटले काही बोलावे, पण त्याने मग ओठ मिटले.
नव्हते का मागेच त्याचे समजावणे व्यर्थ ठरले ?
त्या अटळ चर्चा, वितंडवाद, विनवण्या, धमक्या –
सगळ्या कळवळ्याचे अखेर काय झाले ?
शब्दाचे निमंत्रण अनिवार मोहाचे, तेवढेच फक्त मागे उरले.

आणि आता तो निघाला त्या मोहामागे दृढपणे
त्याला वाटले, थांबावे का अंगणात निदान मेंदीच्या कुंपणापाशी,
म्हणावे का एखादे निरोपाचे हळवे गाणे ?
पेरावे का एखाद्या फुलझाडाचे बी तरी आठवण म्हणून ?
निदान पाखरांसाठी टाकून जावेत का चार दाणे ?

केले नाही त्याने तसे काहीच, फक्त तो खाली वाकला.
आणि चिमूटभर धूळ मस्तकी लावत पुटपुटला—
' मी जातो आहे त्या प्रदेशात असेलही इतके सारे भयंकर,
पण तू सांग आयुष्य इथे तरी कुठे आहे सहज, सोपे आणि सुंदर ?

तिथे असतील दऱ्या, पण असेलच ना दरीत उतरणारी
एखादी लहान पायवाट, तिच्यावर रानफुले हसणारी ?
असेल एखादे मुठीएवढे रंगीत पाखरू कुणी न पाहिलेले,
आणि रानाच्या गाभ्यात रेंगाळत असेल त्याचे गाणे ओले ओले.

मला हे काही भेटणारच नाही
असे समजणाऱ्या माझ्या प्रियजनांना
सोपवतो आहे मी तुझ्याकडे.
आणि जातो आहे तुझ्या ओळखीच्या परिघातून
एका उत्कट हाकेच्या अज्ञाताकडे. '

तो निघून गेला घरातल्या आकांताकडे वळूनही न बघता.
धूळ उडाली वाऱ्यावर उंच आणि बसली
त्याचे वेडेपण पदरात बांधताना फक्त उदास हसली.

२७.३.१९८९

## पुऱ्या झाल्या ओवीमध्ये

जळल्या रात्रीवर सडा शिंपून भुईफुले काढली तिने पहाटे पहाटे,
लिंपल्या चिराभेगा, चूल-पोतेरे केले,
लय धरून गोड हसरे पाणी शेंदून काढले.
असेल नसेल ते आंबटगोड मथवले,
मऊ मायेचे लोणी हातावर नाचवले,
भरवले, पुरवले, उरवले आल्यागेल्यांसाठी,
निवडणाचे चार दाणे उडवले चिमण्यांसाठी.

संध्याकाळी मूळ सांगून सावल्या आल्या लांबून लांबून,
गेली नाही ती, नाही ' जा ' म्हणाली, गळाभर नुसती हसली.
उलटणाऱ्या अंधाराचे अंगभर डाग पदरात झाकून बसली.

चंद्र म्हणतो मावळतो, सूर्य म्हणतो उगवतो,
तिने जाते घातले.
मग मात्र मन तिचे तिला न जुमानता,
बारा वाटा सुटले.

आंब्याखाली, चिंचेखाली, रहाटावर वर-खाली
इवलं अर्धुक हसण्याचं, गाभुळओलं बघण्याचं,
माजघरात झांजरणाऱ्या झोपाळ्यावर निजण्याचं,
गवतामध्ये फसत्रे पाय, वर झुकल्या घोसाचं,
दाट मरव्या वासाचं.
पहिल्या कोऱ्या साडीचं न् भरल्या फुलांच्या वाडीचं.
सगळं जग ओच्यामधून मनानं आणलं विधूळवाणं
घाम गळेतो दळता दळता उरी फुटून आलं गाणं.
एकेक घास दाण्यासकट एकेक शब्द जगून झाला
पुऱ्या झाल्या ओवीमध्ये जन्म तिचा उजून आला.

१७.५.१९८९

## अपरात्री

अपरात्र. बाहेर वादळी पावसाचे थैमान आणि दार वाजले
ती जागीच. शब्दाचे असे येणे तिला अनपेक्षित नाही वाटले.

जमिनीला हात देत कष्टाने उठली ती, त्याला आत घेतले
त्याचा भला दांडगा देह, भेदक डोळे, भिजलेले अस्ताव्यस्त केस,
तिला काहीच नाही अनोळखी वाटले.

युगे लोटलेली त्याची वाट पहाणे सोडून दिले त्या गोष्टीला
त्यानंतर जन्मली तिची दोन वांड मुले, चार मुली,
सगळा संसार झाला.

मग एक एक करत मिटल्या गोष्टी, ती म्हातारी म्हातारी झाली
पण मनातळच्या मनापाशी, बाळंतिणीच्या खोलीत जशी
एक इच्छा तशीच राहिली –

बाहेर पाऊस, आत बाज, खाली गरम निखारे
तान्हा अंधार घुटीच्या वासाचा, गोड उबेतले सारे.

शब्द तिला हवा होता तसा, तिच्या छातीशी हलणारा
तिची कूस फाडून आलेला, अगदी जन्मखुणांसकट
तिचे रक्त-मांस वागवणारा.

दिवस लोटले, वर्षे गेली आणि आता तो आला,
तसा नव्हे तान्हा निरागस, उलट वाढलेला भला थोरला.

तिला नवल वाटावे, पण नाही वाटले.
भोगलेले अवघे आयुष्य, भाकरतुकड्यासारखे,
सरळ तिने त्या पारठ्या पोरावरून ओवाळून टाकले.
त्याचे डोके वाकवले तिने, अंगावरच्या जुनेराने केस पुसले,
चुलीतले निखारे फुलवून बाळंतिणीच्या खोलीसारखे घर ऊबदार केले

तो चकित, भरून आला युगांच्या ओढीने,
त्या अनोळखी आईभोवती त्याने हात टाकले.
आणि तिच्या सुरकुतलेल्या आयुष्यासाठी,
आपले सगळे अर्थ तिला देऊन टाकले.

२६.५.१९९०

## भुकेला शब्द

बेफाम कोसळत होता पाऊस
भर दिवसाच अंधारून आलेले.
बधिर झालेले सगळे आतबाहेर,
जग सरींनी सारवलेले.

तिने घट्ट बंद केले आपले घर
एकटेपणाचे कवाड लावले.
आणि भुकेल्या शब्दाच्या पुढ्यात,
शांतपणे आपले मन ठेवले.

१.६.१९८९

## करुणाष्टक

उतरुन हळु येते संधिकालीन माया
स्वजनजनधनाचे दु:ख लागे मिटाया
झरझर स्मरणाची रेघ जाई धुक्यात
मनभर कवितेचा मांडिला मी आकांत

पदर भरुन वारा, गर्द काळोखडोळे
घरभर झुकलेले उंच आभाळ गेले
किणकिण हिरवे जे स्वप्न हातात होते
पिचत पिचत तेही खोल मांसात जाते

क्षण क्षण जगलेला होत प्राणात गोळा
अरुन फिरुन येई इंद्रियांना उमाळा
अनुभव नवलाचे स्वप्न सारून आले
हळुहळु कळते की, काहि नाही कळाले

गडद गडद झाले सावळे मेघ काळे
लुकलुक हृदयाची चांदणी त्यात हाले
सगुण म्हणुन घ्यावे शब्द तेही रिकामे
अवघड मन, त्याचे दु:ख कोणास ठावे

२६२०
२६३०

नितळ गगनपात्री लगता चंद्रज्योती
कितिक हरवलेले छंद भेटून जाती
खळबळ हृदयाची दाखवावी कुणाला
झडुन झडुन पाखे अर्थ राहे उशाला

झिरमिर क्षितिजाचे काठ जाती भिजोनी
अडत वळत वाहे संथ काळोखपाणी
बहरुन घळलेल्या लक्ष तारा जळात
लवलव रचनेचा बंध ये ना मनात

पद पद खुडताना कोण सायास व्हावे
गुणगुण करताना का न गाणे जुळावे ?
सहज सुचुन जावे कोवळे मर्म काही
तरळ अशि अवस्था काय भाग्यात नाही !

मिटवुन सुख माझे मी उभी स्तब्ध आता
अपरिमित कृपेचा रे टिळा लाव माथां
अपरिचित उदासी खोल प्राणात जागो
प्रभु, तव करुणेचा दीप शब्दांत लागो

२९.५.१९८९

REFBK-0026305

## डॉ. अरुणा ढेरे यांची आगामी पुस्तके

- **काळोख आणि पाणी**

  महाभारतातील काही कथांचा लोकपरंपरेच्या संदर्भात वेध घेणारे चिंतनगर्भ ललितलेख

- **कृष्णकिनारा**

  श्रीकृष्णाशी जिव्हाळ्याचा संबंध असणाऱ्या स्त्रियांच्या जीवनावरील तीन दीर्घ कथा

- **प्रकाशाचे गाणे**

  संतसाहित्यातील आदिबंधांचा शोध घेणारे आस्वादक समीक्षालेख

सुरेश एजन्सी, पुणे

# आमची संग्राह्य पुस्तके

वडीलधारी माणसे

**शान्ता ज. शेळके**

पावसाआधीचा पाऊस

**शान्ता ज. शेळके**

लावण्ययात्रा

**अरुणा ढेरे**

रूपोत्सव

**अरुणा ढेरे**

काळोखाचे कवडसे

**अरुणा ढेरे**

चंद्रबनातल्या सावल्या

**चंद्रकुमार नलगे**

मंथन

**संपादक : चंद्रकुमार नलगे**

मरणमाळा

**केशव मेश्राम**

आमनेसामने

**केशव मेश्राम**

महाद्वार

**अरुणा ढेरे**

उर्वशी

**अरुणा ढेरे**

सुरेश एजन्सी पुणे

कार्तिकातल्या एखाद्या शांत दुपारी
पायवाटेवर निथळत असावेत
हिरव्या उन्हाचे कवडसे,
तसे स्तब्ध दु:खावर निथळणारे
तुझे श्वास मला आठवतात.

तरुण मुलींच्या ओठांवर
अकारण उमलणाऱ्या गुणगुणण्यासारखे
जगण्याचे उमाळे नसांमधून दाटून येतात.

हे सगळे कसे घडते कळत नाही
पण भरून जाते मन
एखाद्याच्या नुसत्या सद्भावनेनेही.

गाण्याच्या उगमापाशी
सर्वस्व नवे करणारा नि:संदर्भ आदिकाळोख
जसा भेटतो हृदयस्पर्शी रीतीने,
तसे आयुष्य भेटते मला;
आणि मागच्या-पुढच्या साऱ्या कवितांची
मंत्राक्षरे होतात,
जगण्याचे उमाळे नसांमधून दाटून येतात.